रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ८६
www.ramprahar.com

# राम प्रहर

सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

जेएनपीएच्या अध्यक्षपदी गौरव दयाळ नियुक्त/२
खोपोली-नेरळ रेल्वेमार्गावर जम्बो मेगाब्लॉक/५
भारताकडून वेस्ट इंडिजला फॉलोऑन/८

## बिहार निवडणुकीसाठी एनडीएचे जागावाटप ठरले!



**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)मध्ये जागावाटपावर शिक्कामोर्तब झाले आहे. भाजप आणि जनता दल (युनायटेड) प्रत्येकी १०१ जागांवर उमेदवार उभे करतील, तर चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टीला २९ जागा देण्यात आल्या आहेत. याशिवाय, जितनराम मांझी यांच्या हम (हिंदुस्तानी अवाम मोर्चा) आणि रालोमो (राष्ट्रीय लोकमत पार्टी) यांना प्रत्येकी सहा जागा मिळाल्या आहेत. दिल्लीमध्ये झालेल्या बैठकीत अंतिम स्वरूप दिल्यानंतर रविवारी (दि. १२) केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी जागावाटपाबाबत अधिकृत घोषणा केली. भाजपचे बिहार प्रभारी विनोद तावडे यांनी दिल्लीतील पत्रकार परिषदेत सांगितले की, एनडीएच्या चारही पक्षांनी जागांच्या वाटपावर अंतिम सहमती दर्शवली असून सर्वजण बिहारमध्ये पुन्हा एनडीए सरकार आणण्यास कटिबद्ध आहेत.

# आगामी निवडणुकांसाठी भाजपची तयारी

## ठाणे-कोकण विभागीय नियोजन बैठक उत्साहात






**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपची ठाणे-कोकण विभागीय नियोजन आढावा बैठक शनिवारी (दि.११) मोठ्या उत्साहात झाली. ही बैठक म्हणजे एकजुटीची वाटचाल आणि 'स्थानिक ते राष्ट्रीय' विजयाची दिशा दाखवणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

या बैठकीला भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार नारायण राणे, मंत्री सर्वश्री गणेश नाईक, चंद्रशेखर बावनकुळे, नितेश राणे, भाजप महामंत्री आमदार विक्रांत पाटील, माधवी नाईक यांच्यासह ठाणे-कोकण विभागातील खासदार, आमदार, नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत मतदारसंघनिहाय नियोजन, संघटनात्मक बळकटी आणि निवडणूक तयारीचा सखोल आढावा घेण्यात आला. कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकांसाठी मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि अन्य वरिष्ठ नेत्यांनी विजयाचा आत्मविश्वास बळकट केला. प्रमुख नेत्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून निवडणुकांच्या दृष्टीने पुढील वाटचाल होणार आहे.

# भारतरत्न डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक, आर्थिक समानतेची स्वप्नपूर्ती व्हावी

## सरन्यायाधीश भूषण गवई यांचे प्रतिपादन



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

मंडणगड येथे झालेल्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत, कमीत कमी खर्चात न्याय मिळेल या दृष्टीने आपण सर्वजण प्रयत्नशील राहावे, जेणेकरून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक आणि आर्थिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केली.

मंडणगड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन रविवारी (दि. १२) सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री डॉ. उदय सामंत, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, पालक न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस.पी. तावडे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनोद जाधव आदी उपस्थित होते. या वेळी प्रमुख मान्यवरांनी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

## रायगड जि.प. आणि पं.स. सदस्यपदासाठी आज आरक्षण सोडत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यपदांची आरक्षण सोडत सोमवारी (दि. १३) काढण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांचे राजकीय भवितव्य या आरक्षण सोडतीतून ठरणार आहे.

रायगडात जि.प.च्या एकूण ५९, तर १५ पं.स.मध्ये मिळून ११८ जागा आहेत. त्यापैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग यासाठीचे आरक्षण निश्चित केले जाईल. त्याचबरोबर महिलांसाठी ५० टक्के आरक्षण कुठल्या मतदारसंघाला द्यायचे हे ठरेल.

जि.प. सदस्यपदांसाठीची सोडत सोमवारी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात होईल, तर पं.स. सदस्यपदांचे आरक्षणासाठी प्रत्येक तालुक्यात सकाळी ११ वाजता सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

## १५ ऑक्टोबरपासून वादळी पावसाचा अंदाज

**मुंबई :** सध्या हवामान पूर्णपणे कोरडे आहे आणि नैऋत्य मान्सूनने राज्यातून निरोप घेतला आहे, मात्र १५ ऑक्टोबरपासून हवामानात परत एकदा बदल अपेक्षित असून किमान १८ ऑक्टोबरपर्यंत विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात ढगाळ हवामान आणि दुपारनंतर वादळी पाऊस अपेक्षित आहे. शेतकऱ्यांनी नियोजन करून पिकांना सुरक्षित ठेवावे, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते फुलपाखरू उद्यानाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चॅरिटेबल ट्रस्ट आणि महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १२) साईनगर येथे फुलपाखरू उद्यान भूमिपूजनाचा तसेच रोटरी घनदाट जंगल प्रकल्पाचा तिसरा वर्धापन दिन सोहळा उत्साहात झाला. या वेळी फुलपाखरू उद्यानाचे भूमिपूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. 'रोटरी'चे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखालील या उपक्रमामुळे पनवेलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.



या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार बाळाराम पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, शिवसेना उबाठा गटाचे नेते बबन पाटील, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, गणेश कडू, डॉ. अरुणकुमार भगत, जयंत पगडे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, डॉ. सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, सारिका भगत, महिला मोर्चा शहराध्यक्ष रूचिता लोंढे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, उपायुक्त विधाते आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## निवडक

### अफगाणिस्तानच्या हल्ल्यात पाकिस्तानचे ५८ सैनिक ठार

**कराची :** अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष वाढला आहे. पाकिस्तानने शुक्रवारी हवाई हद्दीचा भंग करत काबूलसह अफगाणिस्तानातील दोन ठिकाणी हल्ला केल्याचा दावा तालिबान सरकारने केला होता. त्यानंतर शनिवारी रात्री दोन्ही देशातील संघर्ष पेटला. अफगाणिस्तानने पाकिस्तानी लष्कराच्या चौक्यांना निशाणा बनवले. यात ५८ पाकिस्तानी सैनिक मारले गेले, तर ३० जखमी झाले आहेत. तालिबान सरकारच्या प्रवक्त्याने हा दावा केला आहे.

### दुर्गापूर बलात्कार प्रकरणावर ममता बॅनर्जींचे वादग्रस्त वक्तव्य

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या दुर्गापूर येथील एका खासगी मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थिनीवर झालेल्या सामूहिक बलात्काराच्या घटनेने राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. अशातच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या प्रकरणावर पत्रकारांशी संवाद साधताना मुलींनी रात्री बाहेर पडू नये, असे वक्तव्य केल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. या विधानावर अनेक महिला संघटनांनी टीका केली आहे.

## अलिबागच्या खैरवाडीत कुटुंबावर बहिष्कार; ३३ जणांवर गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मांत्रिकाच्या बतावणीवर विश्वास ठेवत अलिबाग तालुक्यातील खैरवाडी येथील एका कुटूंबाला वाळीत टाकल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी रेवदंडा पोलिसांनी ३३ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

खैरवाडी येथील धर्मा दामू गडखळ यांच्या १५ वर्षीय मुलाचा सन २०१९मध्ये आजारपणात अचानक मृत्यू झाला होता. आपल्या मुलावर गावातील तुकाराम दवेजी दरोडा यांनी देवदेवस्की केली व त्यामुळेच त्याचा मृत्यू झाल्याचा गैरसमज धर्मा गडखळ व त्यांचा भाऊ गणपत दामू गडखळ यांनी पाठवाडी येथील मांत्रिक लहू गडखळ व मधू गडखळ यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवत करून घेतला. त्याचप्रमाणे १६ सप्टेंबर २०२१ रोजी समाजमंदिरात गावकीची बैठक घेऊन तुकाराम दरोडा यांच्यावर देवदेवस्की व करणीचा आरोप करून त्याचा दंड म्हणून ६० हजार रुपयांची मागणी केली. त्यास दरोडा यांनी नकार दिला.

या रागातून गावकीचे पंच व ग्रामस्थ अशा ३३ जणांनी आपापसात संगनमत करून तुकाराम दरोडा यांना गावकीतून वाळीत टाकण्यात आल्याचा ठराव मंजूर केला तसेच त्यांच्याशी व कुटुंबियांशी संबंध ठेवणाऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये दंड व बोलताना ग्रामस्थांना पकडून देणाऱ्या व्यक्तीस एक हजार रुपये बक्षीस घोषित केले.

सामाजिक बहिष्कार टाकून अनेक गोष्टींपासून वंचित ठेवल्याने तुकाराम दरोडा यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार ३३ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपींमध्ये जयेश विठ्ठल ढेबे, रामा पारधी, गजानन देवजी पारधी, राम वामन लोभी, हिराजी भाग्या काष्टी, धर्मा देवजी गडखळ, गणपत दामू गडखळ, देवजी अंबाजी पारधी, प्रकाश महादू हंबीर, प्रदीप महादू हंबीर, यशवंत दगडू काष्टी, धर्मा सोन्या मेंगाळ, मधू जानू दरोडा, रामा सोमा दरोडा, तानाजी सोमा दरोडा, किशन पांडू दरोडा, कमलाकर रावजी गडखळ, बाळू विठ्ठल शीद, मारूती विठ्ठल शिद, रामा काळू पारधी, दिलीप रामा लोभी, आशिष राम लोभी, कुशा वारगुडे, भास्कर गणपत काष्टे, मारूती हिराजी पाचांगे, रामदास सोमा पाचांगे, शांताराम बाळू शीद, तुळशी धर्मा गडखळ, कल्पना गणपत गडखळ, चांगुणा रामदास पाचंगे, गौरी दिलीप लोभी, हशी राम लोभी यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# शेकाप कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून नवागतांचे स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीत शेतकरी कामगार पक्षाला धक्का बसला असून अनेक तरुण, महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी नगराध्यक्ष नेते जे.एम. म्हात्रे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. हा पक्षप्रवेश माजी नगरसेवक रवींद्र भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनावेळी झाला.

या कार्यक्रमाला माजी नगरसेवक बबन मुकादम, राजू शर्मा, माजी नगरसेविका मोनिका महानवर, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, माजी नगरसेविका सुरेखा मोहोकर, अमर ठाकूर, अशोक मोटे, रामा महानवर, सुरेश भोईर, सरस्वती काथारा आदी उपस्थित होते.



या वेळी कळंबोली शहर आणि गावातील शेकापच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपत प्रवेश केला. यामध्ये ज्ञानेश्वर घाडगे, निलेश भगत, राजा साळुंखे, अजित जाधव, संदीप पाटील, चंद्रकांत पाटील, भारती वाघ, शोभा पडळकर, सुमती पाटील यांचा समावेश होता. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

देशहिताची विचारधारा आणि नागरी विकासकामांसाठी कटिबद्ध असलेल्या भाजपमध्ये विविध पक्षांतील पदाधिकारी, कार्यकर्ते प्रवेश करीत आहेत. पनवेल परिसरात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यशैलीवर प्रभावित होऊन अनेकजण भाजप परिवारात सहभागी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# कळंबोलीत भाजपतर्फे बाजारभावापेक्षा स्वस्त दरात दिवाळी फराळाचे साहित्य





**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

दीपावलीचा सण जवळ आल्याने कळंबोली येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून बाजारभावापेक्षा स्वस्त दरात दिवाळी फराळ साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ रविवारी (दि. १२) करण्यात आला. भाजप कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, माजी मंडळ अध्यक्ष रविनाथ पाटील, बबन बारगजे, अमर ठाकूर, अशोक मोटे, सरस्वती काथारा, मनीषा तिवारी, अतुल वाघमारे, दत्तात्रय फरांदे यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

या उपक्रमात खोबरे, शेंगदाणे, रवा, मैदा, चणाडाळ, साखर, गूळ, पोहे, जेवणाचे तेल व डाळ अशा वस्तू बाजारभावापेक्षा कमी दरात नागरिकांना जय अपार्टमेंट, सेक्टर ४, शिर्के गार्डनजवळ, कळंबोली येथे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १२ ते १५ ऑक्टोबरदरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हा उपक्रम सुरू राहणार आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कळंबोली भाजपकडून करण्यात आले आहे.

## भाजपमध्ये इनकमिंग सुरूच




**उरण : भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून पराग काठे, निलेश मर्चंडे (काँग्रेस), बंटी वाल्मिकी (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), संजय हनुमंतराव गायकवाड तसेच नवोदित व अनुभवी कार्यकर्त्यांनी आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.**

# खारघरमध्ये इमारतीला आग

## चार जण रुग्णालयात दाखल



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर उपनगरातील येथील सेक्टर ३४ मधील ट्रायसीटी इमारतीमधून दुपारी धुराचे लोट येऊ लागल्याने परिसरात एकच खळबळ माजली. रविवारी दुपारी एक वाजून २० मिनिटांनी सेक्टर ३४ मधील ट्राय सिटी बिल्डिंगच्या १० ते १४ व्या मजल्यावर वीजेच्या शॉर्टसर्किटमुळे आग लागली.

या घटनेनंतर तातडीने अग्निशमन दलाचे जवान बंबासह आणि खारघर पोलीस घटनास्थळी काही वेळात पोहचले. नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाला तात्काळ पाचारण करण्यात आले. अग्निशामक कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. तथापि, धुरामुळे श्वासोच्छ्वासाचा त्रास झाल्याने चार जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जखमींमध्ये सुमन कुमारी नीरज भारद्वाज (३१), वाणीच नीरज भारद्वाज (९), तेजस्वी राजेश कुमार सिंग (१९) आणि यशस्वी राजेश कुमार सिंग (१६) यांचा समावेश आहे. सर्वांना तातडीने खारघर येथील मेडिसिटी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली आहे.

अग्निशामक विभाग आणि पोलिसांनी तत्परतेने मदतकार्य हाती घेतल्याने मोठे नुकसान टळले. घटनेनंतर परिसरातील रहिवाशांना तात्पुरते बाहेर काढण्यात आले होते. आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पुढील तपास खारघर पोलिसांकडून सुरू आहे.

## दिवाळीच्या फराळासाठी महिलांची लगबग सुरू

**तळा : प्रतिनिधी**

दिवाळीचा सण जसजसा जवळ येत आहे. तसतसे महिलावर्ग फराळ तयार करण्यात व्यस्त होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

तळा शहरापासून ते ग्रामीण भागातील महिला फराळ बनविण्यासाठी लागणारे साहित्य रवा, चणाडाळ,मैदा,तेल ,तुप,साखर,पोहे इत्यादी साहित्य खरेदी करून व्यवस्थितपणे पदार्थांना चव येईल असे कडधान्य व साहित्याचे मिश्रण करून त्याचे योग्य चविचे पिठ करून चकली,करंजी,लाडू, शंकरपाळी,चिवडा असे पदार्थ महिलांनी आपल्या घरीच बनविण्यास सुरुवात केली आहे.

काही महीला हे पदार्थ तयार करून विक्रीही करत आहेत..घरगुती पदार्थ म्हणून अनेक नागरिक हे पदार्थ आवडीने खरेदी करत असतात.या घरगुती पदार्थांना मागणी वाढताना दिसत आहे.घरीच बनविलेले पदार्थ हे चविष्ट तर असतातच त्याच बरोबर विश्वासाने दर्जेदार म्हणून या पदार्थांची ख्याती असते.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात सर्वांनाच दिवाळीचा फराळ बनविता येईल असे नाही. त्यामुळे बाहेरून विकत घेतात. हा बाहेरून विकत घेतलेल्या पदार्थांना चव असेलच असे नाही व कधी कधी दर्जाही नसते. त्यामुळे दुकानातील फराळ खरेदी करण्यापेक्षा घरगुती फराळ विकत घेण्याकडे नागरिकांचा कल अधिक असल्याचे दिसत आहे.सध्या शेतकरी वर्गाला मात्र या वर्षाची दिवाळी ही शेतीच्या कामात जाणार असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

## ऑकलंड दिवाळी महोत्सवात कथ्यक नृत्याला न्यूझीलंडच्या पंतप्रधानांकडून दाद

**मुरुड : प्रतिनिधी**



अभिनय , गायन आणि नृत्याच्या माध्यमातून वैदिक संस्कृतीचा वारसा लाभलेल्या कथ्यक नृत्या द्वारे सातासमुद्रा पलिकडे न्युझिलंड मधील ऑकलंड येथे दिवाळी महोत्सवाच्या निमित्ताने मुरुडच्या स्नुषा मानसी कामोद नामजोशी यांनी नूपुर डान्स अकॅडमी तर्फे भारतीय कलाविष्कारातुन न्युझीलंडचे पंतप्रधान क्रस्तोफर लुक्सन यांची कौतुकाची थाप मिळवुनभारतीय संस्कृतीची गरीमा उंचावली आहे. न्युझीलंडच्या दिवाळी महोत्सवात उद्घाटन सोहळ्यात सादरीकरणाची संधी मिळाल्याने नामजोशी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे .

रायगड जिल्हयातील मुरुडचे कामोद नामजोशी हे ऑकलंड मध्ये नोकरीनिमित्त वास्तव्य करीत असुन त्यांच्या अर्धांगिनी मानसी नामजोशी या नुपूर डान्स कडमीच्या माध्यमातून ३ वर्षांपासून कथ्यक नृत्याचे धडे ६ ते ८ या वयोगटातील मुलींना देत असुनऑकलंड येथे अमेरिका व ऑस्ट्रेलिया येथे ऑनलाईन क्लासेस घेत आहेत .

पुणे येथील प्रसिद्ध नृत्यांगणा सोनियाताई परचुरे या त्यांच्या त्या शिष्या असुन राजश्रीताई जावडेकर यांच्या कडून गायन कला त्यांनी आत्मसात केली आहे .नुपूर अकॅडमीच्या प्रतिनिधींना पंतप्रधानांशी काही क्षण संवाद साधण्याची संधीही मिळाली हा क्षण सर्वांसाठी अभिमानास्पद ठरला असल्याचे मत संचालिका मानसी कामोद नामजोशी यांनी व्यक्त केला. या महोत्सवात अकॅडमीच्या लहानग्या कलाकारांनी रंगमंचावर आपल्या सुंदर नृत्याने उपस्थितांची मने जिंकली.

## रसायनी येथे कारखान्यात चोरी करणारे तिघे अटकेत

**खोपोली : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत कासप गाव येथील सत्वारो कोटींग प्रायव्हेट लिमिटेड कारखान्याच्या कार्यालयातून २ लाख २०हजार आठशे रुपये रक्कम चोरी करणा-या तिघांना पोलीसांनी अटक केली आहे.

८ ऑक्टोंबर रोजी रात्रीच्या सुमारास कारखान्याचे इमारतीमधील मागील बाजुस जाळी असलेला लोखंडी दरवाजा तोडून चोरट्यांनी कार्यालयातील टेबलमधील लॉंकर तोडुन लॉंकरमध्ये ठेवलेली रक्कम चोरी करून नेली होती. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. रसायनी पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्ह्यातील तीन आरोपींना दिनांक ११ ऑक्टोंबर रोजी रात्री पावणेदहाच्या सुमारास अटक केली. अधिक तपास मपोसई अनुसया ढोणे हे करीत आहेत.

## होनाड येथील उपकेंद्रात आरोग्य तपासणी शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**



आडोशी विभाग जरी प्रगतशील असला तरी आदिवासी वाड्या ह्या काही प्रमाणात मागासलेल्या आहेत. जनताही आपल्या आरोग्याविषयी पाहिजे तेव्हडी काळजी घेत नाही.त्यामुळे होनाड ग्रामपंचायतीचे सरपंच प्रकाश पाटील यांनी होनाड ग्रामपंचायत,आरोग्य विभाग खालापूर आणि मर्क कंपनी बोरिवली यांच्या संयुक्त विद्यमानातून होनाड येथील उपकेंद्रात भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत शेकडो रुग्णांची यावेळी तपासणी करून मोफत औषध देण्यात आले.यामध्ये लहान मुले महिलांच्या आरोग्याची तपासणी करीत रक्तदाब आणि मधुमेह यांचीही तपासणी करण्यात आली. यावेळी ज्या रुग्णांना उपचाराची गरज आहे त्यांच्यावर उपचार करीत मोफत औषधे देण्यात आली.

यावेळी होनाड ग्रामपंचायतीचे सरपंच प्रकाश पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना,आपण ग्रामपंचायत हद्दीतील जनतेचे दायित्व स्वीकारले आहे. त्यामुळे या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यासाठी आरोग्य विभाग खालापूर आणि मर्क कंपनी बोरिवली यांनी महत्वाची भूमिका बजावत शेकडो रुग्णांची तपासणी केली आहे.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ शिवानी इंगोले यांनी या आरोग्य तपासणी शिबिराबाबत समाधान व्यक्त केले असून भविष्यात प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये अश्या शिबिराचे आयोजन होणे गरजेचे आहे जेणेकरून नागरिकांचे आरोग्य चांगले राहील असे प्रतिपादन केले.

## जेएनपीएच्या अध्यक्षपदी गौरव दयाळ

**उरण : रामप्रहर वृत्त**



जेएनपीएच्या अध्यक्षपदी २००४ च्या उत्तर प्रदेश बॅचचे आयएएस अधिकारी गौरव दयाळ यांची केंद्र सरकारने नियुक्ती केली आहे. शनिवारी ११ ऑक्टोबरला त्यांची बंदर जहाज आणि जलवाहतूक मंत्रालया अंतर्गत ही नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची ही नियुक्ती पुढील पाच वर्षाकरीता करण्यात आली आहे. संजय सेठी यांच्या नंतर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या दीड दोन वर्षांपासून हे पद रिक्त होत. त्याऐवजी उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांची प्रभारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

सध्या जेएनपीए कडून विविध प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. यात बंदरावर आधारित सेझ,हरित बंदराचे स्वप्न साकार करण्यासाठी ई वाहने,बंदर आणि परिसराचे सुशोभीकरण, मुंबई दिल्ली रेल्वे माल वाहतूक कॉरिडॉर, बंदराच्या कामगार वसाहतीतील सीबीएससी विद्यालयाची उभारणी आदी कामे सुरू करण्यात आली आहेत. बंदरात नव्याने सिंगापूरचे बी एम सी टी या बंदराच्या दुसऱ्या टप्प्याचे उदघाटन करण्यात आले आहे. त्यामुळे बंदरातील कंटेनर हाताळणीची क्षमता ७३ लाखांवरून १ कोटीवर पोहचणार आहे. या भरारी मुळे जेएनपीए बंदर हे जगातील ९६ व्या क्रमांकावरून २३ व्या क्रमांकावर पोहचला आहे. तर कंटेनर हाताळणीत जेएनपीए देशातील प्रथम क्रमांकाचे बंदर बनले आहे. बंदराच्या माध्यमातून विविध विकास कामे सुरू आहेत.



**खोपोली : भाजपचे माजी नगरसेवक अविनाश तावडे यांचे पुत्र बंटी यांच्या साखरपुड्या सोहळ्यानिमित्त कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे, माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसूरकर, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, शिंदे गटाचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख उल्हास भुरके इत्यादी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून शुभाशीर्वाद दिले.**

## आधार नोंदणी, अद्यावतीकरण सेवांसाठी नवे दर लागू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या कार्यालयीन ज्ञापनानुसार दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी आधार नोंदणी, अद्यावतीकरण तसेच अनिवार्य बायोमेट्रिक अद्यावतीकरण सेवांसाठी सुधारित दर निश्चित करण्यात आले आहेत. हे नवे दर दि. १ जानेवारी २०२५ ते ३० सप्टेंबर २०२८ या कालावधीत लागू राहणार आहेत.

UIDAI कडून जाहीर केलेल्या दरांनुसार नवीन आधार नोंदणी: निःशुल्क, बाल आधार (५ वर्षानंतर बायोमेट्रिक अद्यावतीकरण): निःशुल्क, अनिवार्य बायोमेट्रिक अद्यावतीकरण (५ ते ७ व १५ ते १७ वयोगटासाठी): निःशुल्क, १७ वर्षांवरील बायोमेट्रिक अद्यावतीकरण: रु. १२५/- (GST gh), सर्वसाधारण आधार अद्यावतीकरण (बायोमेट्रिक + डेमोग्राफिक): रु. १२५/- (GST gh), फक्त डेमोग्राफिक अद्यावतीकरण (नाव, पत्ता, मोबाईल, लिंग इ.): रु. ७५/- (GST gh), ओळखपत्र / पत्त्याचा पुरावा अद्यावतीकरण: रु. ७५/- (GST gh), ]-रवहररी पोर्टलद्वारे झे-/झेख अद्यावतीकरण: रु. ७५/- (GST gh), ई-आधार कलर प्रिंट: रु. ४०/- (GST gh), घरपोच आधार नोंदणी (Home Enrolment): रु. ७००/- (GST gh)

नागरिकांनी या दरांव्यतिरिक्त कोणतीही अतिरिक्त आकारणी झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड (सामान्य प्रशासन शाखा - माहिती तंत्रज्ञान विभाग) तसेच संबंधित तहसिलदार कार्यालयात तक्रार दाखल करावी. याशिवाय UIDAIच्या टोल फ्री क्रमांक १९४७ वरही तक्रार नोंदवता येईल.

प्रशासनाने नागरिकांना Mask -adhaar चा वापर करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून आधार क्रमांकाचा गैरवापर टाळता येईल.

## हेलपाटा कादंबरी उस्मानिया विद्यापीठाच्या एमए अभ्यासक्रमात

**रोहे : प्रतिनिधी**



गेली दोन अडीच वर्ष समाजमाध्यमावर गाजत असलेली लेखक तानाजी धरणे यांची संघर्षमय हृदयस्पर्शी कादंबरी हेलपाटा हैद्राबाद येथिल उस्मानिया विद्यापीठाच्या एम ए च्या अभ्यासक्रमात समावेश झाल्याचे मराठी विभाग प्रमुख प्रा . डॉ . नम्रता बागडे मॅडम यांनी दुरध्वनीद्वारे तानाजी धरणे यांना कळवले असुन त्यांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले आहे .

हेलपाटा ही कादंबरी कॉलेज जीवनातील विद्यार्थ्यांना अतिशय प्रेरणा देणारी असुन संघर्ष , जिद्द ,चिकाटी, मेहनत आणि शिक्षण हेच यशाच गमक असल्याचे शिक्षण हि कादंबरी देते. विद्यार्थ्यांनी आपल्या कॉलेज जीवनात संघर्ष करुन मोठ व्हावं हा बोध या कादंबरीतुन मिळत असल्याने कादंबरी वाचकाच्या हृदयाचा ठाव घेते . या कादंबरीला एकुण २१ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले असुन ८९ परिक्षणे झाली आहेत .

तानाजी धरणे यांचे आत्तापर्यंत सहा कवितासग्रह प्रकाशित असुन त्यात शेताच्या बांधावर ,सांजवेळ , स्वप्नचित्र ,चांदणं पेरित जाऊ , होरपळ , नांगरतो तळहाताच्या रेषा . यांचा समावेश आहे . आपली हेलपाटा ही संघर्षमय हृदयस्पशी कादंबरी विद्यापीठ स्तरावरती अभ्यासाला लागली त्याबद्दल फार आनंद झाल्याचे तानाजी धरणे यांनी कळवले आहे .धरणे हे ग्रामसेवकाची नोकरी करतात

## स्वामिनी प्रतिष्ठान व आमदार थोरवे फाउंडेशनतर्फे दिवाळीचा शिधा वाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

स्वामिनी महिला प्रतिष्ठान व महेंद्र थोरवे फाउंडेशन तर्फे घरकाम करणाऱ्या कष्टकरी महिलांना स्वामिनी प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा कांचन जाधव यांच्या संकल्पनेतून आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशन आणि कुलदिपक शेंडे यांच्या सहकार्यातून घरकाम करणाऱ्या ५०० हून अधिक महिलांना रवा, मैदा आणि साखरेचे वाटप करण्यात आले

प्रारंभी राजमाता जिजाऊ, व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमासमयी खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, स्वामिनी महिला प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष कांचन जाधव, उपाध्यक्ष शितल ढोकळे, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, माजी नगरसेवक मोहन औसरमल, शिवसेना महिला आघाडी संघटिका प्रिया जाधव, शिवसेनेचे दिनेश थोरवे, राहुल गायकवाड, अनिल मिंडे, गणेश खानविलकर, महिला आघाडीच्या मेधा वाडकर, सोनिया रुपवते, इंदू पाटील, जयश्री मिंडे प्रमुखांसह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

या छोट्याशा कार्यक्रमातून मला महिलांची सेवा करण्याची ही संधी मिळाली तसेच कुलदीपक भाई यांनी सुद्धा सहकार्य केले असे स्वामिनी महिला प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा कांचन जाधव यांनी सांगितले

. प्रमुख अतिथी पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी महिलांसाठी राबविलेल्या उपक्रमाबद्दल सर्वांचे कौतुक केले. डॉक्टर हेमंत पाटील यांनी कष्टकरी महिलांसाठी शासनाच्या आरोग्य सेवा योजना आपल्या रुग्णालयात राबविण्यालहळ घोषणा केली. कुटुंबाचा संसार करता करता आरोग्याकडे महिला दुर्लक्ष करतात , महागडी खाजगी आरोग्य सेवा त्यांना परवडत नाही म्हणूनच आपण प्रथमता खोपोलीत ही सेवा सुरू करीत असल्याचे त्यांनी सांगितले त्याचा लाभ कष्टकरी महिलांनी घ्यावा असे आवाहन केले . यावेळी उपस्थित महिलांना शिधा वाटपाचे पॅकेट मान्यवरांचे हस्ते देण्यात आले.

## पान १ वरुन

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते फुलपाखरू उद्यानाचे भूमिपूजन

या वेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डॉ. गिरीश गुणे यांच्या उपक्रमाचे कौतुक करत म्हटले की, डॉ. गुणे यांनी पनवेलकरांसाठी अनेक समाजोपयोगी प्रकल्प उभे केले. ज्या पद्धतीने ते रुग्णांची काळजी घेतात; त्याच प्रेमाने आणि जबाबदारीने त्यांनी झाडांची देखभाल केली. घनदाट जंगल प्रकल्प पाहिल्यावर असे वाटते की, तो सहा-सात वर्षांपूर्वी सुरू झाला, इतकी झाडांची उत्कृष्ट वाढ झाली आहे. फुलपाखरू उद्यानही शहरवासीयांच्या पसंतीस उतरेल, असा मला विश्वास आहे.

या वेळी लोकनेते ठाकूर यांनी फुलपाखरू उद्यान प्रकल्पासाठी पाच लाखांची, तर विस्टा फूटतर्फे सल्लागार चंद्रशेखर सोमण यांनी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली.

## दुखवटा

### सुनिता ढाकणे



**कर्जत :** नगरपरिषद हद्दीत विठ्ठलनगर मध्ये राहणाऱ्या सुनीता शेषराव ढाकणे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधन समयी त्या ५६ वर्षाच्या होत्या.भाजप रायगड जिल्हा युवती प्रमुख ॲड. सुषमा ढाकणे यांच्या त्या मातोश्रीं होत्या. त्यांचे अंतिम संस्कार त्यांचे मूळ गाव अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी येथे पार पडले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### चंद्रभागा केदारी



**मोहोपाडा:** रसायनी सावळे गावातील सामाजिक कार्यकर्ते खंडू केदारी यांच्या आईचे सावळे येथे राहत्या घरी निधन झाले.त्यांच्या पश्चात एक मुलगा, मुलगी, जावई ,सून ,नातवंडे व असा मोठा परिवार आहे.त्यांचा दशक्रिया विधी सोमवार दि.१३/१०/२५ रोजी श्री क्षेत्र गुळसुंदे येथे होणार आहे.तर उत्तर कार्य(तेरावे)१६/१०/२५ रोजी राहत्या घरी सावळे या गावी धार्मिक रीतीरिवाजानुसार होणार आहेत.

# माजी नगरसेवक रवींद्र भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक आणि भाजप रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य रवींद्र भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन शनिवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

उद्घाटन सोहळ्याला नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेवक राजू शर्मा, भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड महिला जिल्हाध्यक्षा प्रिया मुकादम, माजी नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, मोनिका महानवर, सरस्वती काथारा, अमर ठाकूर, प्रभुदास भोईर, बबन बारगजे यांच्यासह अनेक मान्यवर आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून कळंबोली परिसरातील सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आणि नागरिकांशी अधिक संवाद साधण्यासाठी हे कार्यालय प्रभावी ठरेल, असा विश्वास यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, रवींद्र भगत गेली २० ते २५ वर्षे कळंबोलीत सातत्याने काम करत आहेत. त्यांची जनतेशी घट्ट नाळ आहे. त्यांचा भाजपमध्ये प्रवेश म्हणजे जनतेच्या कामाला नवी दिशा मिळणे होय. भाजप नेते जे.एम. म्हात्रे म्हणाले, या कार्यालयाच्या उद्घाटनाला एवढ्या संख्येने नागरिक उपस्थित राहिले, यावरून रवींद्र भगत यांच्यावर जनतेचे प्रेम स्पष्ट होते. त्यांनी सदैव जनहिताची कामे केली आहेत. आज देशात आणि राज्यात भाजपची सत्ता आहे, तसेच या भागातील दोन्ही आमदार भाजपचे असल्याने विकासाची गती अधिक वेगाने वाढेल. रवींद्र भगत म्हणाले, मी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला, यामागचा हेतू एकच कळंबोली आणि माझ्या प्रभागाचा विकास करणे. शेकापमधून नगरसेवक असतानाही मला सत्ताधारी भाजप नगरसेवक आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून नेहमीच सहकार्य मिळाले.

## पनवेल परिसरात दोन अपघातांत दोघे ठार, अन्य दोघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील दोन वेगवेगळ्या अपघातात दोन ठार व दोन जखमी झाल्याची घटना घडली आहे . पहिल्या अपघातात पनवेल जवळील मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा पक्षी अभयारण्य खिंडीत झालेल्या दुर्दैवी अपघातात होमगार्ड म्हणून कार्यरत असलेले राजेंद्र जनार्दन पाटील (५०, रा. पेझारी, ता. अलिबाग) यांचा मृत्यू झाला. या अपघातात त्यांच्या पत्नी दीपाली पाटील (४३) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राजेंद्र पाटील हे पत्नीसमवेत हिरो पॅशन मोटारसायकलवरून पोयनाडहून पनवेलकडे खरेदीसाठी येत होते. सकाळी सुमारे ११.३० वाजता कर्नाळा घाटातील उतारावर मोटारसायकल रस्त्यावरील खडीमुळे स्लीप झाली. या घटनेत दोघेही मोटारसायकलवरून खाली पडले.

या अपघातात राजेंद्र पाटील यांचा दुर्दैवी मृत्यू झाला व त्यांची पत्नी जखमी झाली आहे . तर दुसऱ्या अपघातात पनवेल-उरण रोडवर करंजाडे येथे चिन्मय पाटील व त्याचा मित्र निर्भय भगत हे प्रवास करत असलेल्या स्कूटीला अज्ञात वाहन चालकाने धडक दिली. यात चिन्मय पाटील हा गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. त्यात त्याचा मृत्यू झाला. तर निर्भय भगत याला गंभीर दुखापती झाल्या. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## उष्णतेमुळे शीतपेयांची मागणी वाढली

**पनवेल : वार्ताहर**

ऑक्टोबर हीटमुळे प्रचंड उकाडा व घशाला सतत पडणारी कोरड यामुळे शीतपेयांच्या मागणीत वाढ झाली आहे. जीवाची लाही लाही होत असताना गारवा मिळावा, यासाठी चाकरमानी रेल्वे स्टेशन परिसरातील, बसडेपोमधील स्टॉल्सकडे थंड पेयांसाठी धाव घेऊ लागले आहेत.

त्यामुळे स्टॉलधाराकांनीही खाद्यापदार्थापेक्षा थंड पेयांच्या विक्रीवर विशेष भर दिल्याचे दिसून येत आहे. लिंबूपाणी, उसाचा रस व कोकम सरबत, ताक यांच्या मागणीत गेल्या तीन दिवसांत वाढ झाली आहे. १० रुपयांपर्यंत मिळणाऱ्या लिंबूपाणी व कोकम सरबताला सर्वाधिक पसंती मिळत आहे. तर मिनरल वॉटर, कोल्ड्रिंक व अन्य पेयांच्या मागणीत २० ते २५ टक्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्याने सांगितले. तसेच मोसंबी, गाजर, अननस आदी फळांच्या ज्युस स्टॉलवरही गर्दी वाढत आहे. बाजारपेठेत सुद्धा शीतपेयांच्या गाड्यांवर ग्राहकांची गर्दी दिसून येत आहे .

## पनवेलमध्ये बालनाट्य शिबीर

**पनवेल : वार्ताहर**

मुलांनी मोबाइल आणि गेम्सपासून दूर रहावे, त्यांना अभिनयाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळावे, त्यांच्यातून भावी कलाकार घडावेत, भविष्यात त्यांच्या हातून काही निर्मिती व्हावी यासाठी पनवेल कल्चरल सेंटरतर्फे शनिवार दि. १ नोव्हेंबर आणि रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी संस्थेच्या सभागृहात बालनाट्य शिबिराचे आयोजन केले आहे .

या शिबिरात अभिनय म्हणजे काय,अभिनयाचे प्रकार, नवरस आणि त्यांचे महत्त्व, बाल रंगभूमीचा इतिहास, मराठी व भारतीय रंगभूमीची संक्षिप्त ओळख, रंगमंचीय स्टेज आरेखन ओळख व प्रात्यक्षिक, चेहर्यावरील अवयवांचा व्यायाम, व्हॉइस-ओव्हर संदर्भात माहिती, पात्रानुसार बोलण्याची पद्धत कशी बदलत जाईल याची प्रात्यक्षिके, उस्फूर्तपणा म्हणजे काय, इम्प्रोवायझेशन कसं करावं अशा अनेक विषयांचं मार्गदर्शन करण्यात येईल. शिबीराच्या समारोपात शिबिरार्थींचे गट करुन त्यांना विषय देऊन त्यांच्याकडून उत्स्फूर्त सादरीकरण करवून घेतलं जाईल. रंगभूमी, दूरदर्शन मालिका आणि चित्रपट या तिन्ही क्षेत्रांचा अनुभव असलेले आणि स्वत: अभिनेता आणि दिग्दर्शक असलेले दीपक पवार हे या शिबीराचं संचालन करतील. हे शिबीर केवळ ६ ते १६ या वयोगटासाठीच असून यासाठी गुगल फॉर्म भरावा लागेल. शिबिराचे शुल्क रु. १,००० असून पहिल्या केवळ २५ जणांनाच या शिबीरासाठी प्रवेश दिला जाईल.

## राज्यस्तरीय ख्याल गायन स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

युवा पिढीमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताची आवड निर्माण व्हावी, हा समृद्ध वारसा त्यांनी जतन व संवर्धन करावा, या हेतूने गेली २९ वर्षे या संस्थेतर्फे राज्यस्तरीय हिंदुस्तानी शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धा आयोजित केली जात असून यात १६ ते ४५ वयोगटातील केवळ हौशी गायक-गायिकांनी २० मिनिटांच्या कालावधीत ख्याल आणि द्रुत लयीतील बंदिश गावी अशी संस्थेची अपेक्षा आहे.

ही स्पर्धा दोन फेर्यात होईल. पहिल्या फेरीसाठी स्पर्धकांनी स्वत: हजर रहावयाचे नसून आपल्या गायनाचा व्हिडीओ इ-मेल किंवा व्हॉटस् ॲप किंवा टेलिग्रामच्या माध्यमातून १४ डिसेंबर पूर्वी संस्थेकडे पाठवायचा आहे. पहिल्या फेरीचा निकाल दि. २० डिसेंबर रोजी जाहीर करण्यात येईल. पहिल्या फेरीतून १० स्पर्धकांची निवड दि. ११ जानेवारी २०२६ रोजी होणार्या अंतिम फेरीसाठी करण्यात येईल. स्पर्धेची प्रवेश फी रु. ५०० असून ती ऑनलाइन भरता येईल. स्पर्धेचा प्रवेश अर्ज गुगल फॉर्म स्वरुपात भरावा लागेल. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी स्पर्धा समिती प्रमुख मधुरा सोहनी ९९२०७ १८७४५ यांच्याशी संपर्क साधावा.

## खासगी रुग्णालयातून आरोपी पळाला

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असलेला तळोजा पोलीस ठाण्यातील पाहिजे आरोपी रुग्णालयातून पसार झाल्याची घटना दहा ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी पाहिजे आरोपी राजकुमार म्हात्रे (खुटारी) याचा तळोजा पोलीस शोध घेत आहेत.

खुटारी येथील अनिकेत म्हात्रे आणि राजकुमार म्हात्रे यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात सप्टेंबर २०२५ मध्ये परस्पर विरोधी गुन्हे दाखल आहेत. ५ सप्टेंबर रोजी बारा ते तेरा जणांनी राजकुमार म्हात्रे याला मारहाण करून ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी अनिकेत म्हात्रेसह बारा ते तेरा जणांविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी राजकुमार म्हात्रे याने अनिकेत म्हात्रेकडे पिस्तूल रोखत पिस्तूलचा ट्रिगर दाबला. मात्र त्यातून गोळी फायर झाली नव्हती. त्यामुळे याच्याविरोधात देखील १२ सप्टेंबर रोजी तळोजा पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. जखमी राजकुमार म्हात्रे याच्यावर येथील एका खाजगी रुग्णालयातउपचार सुरू होते.१० ऑक्टोबर रोजी आरोपीने खासगी रुग्णालयातून पलायन केले.

## इंटिग्रा स्फीअर-३.०मध्ये 'सीकेटी'चा ध्रुवल म्हात्रे प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. एल. ई. सोसायटीचे सायन्स अँड कॉमर्स कॉलेज कळंबोली, नवी मुंबई तर्फे दि ११ ऑक्टो रोजी इंटिग्रा स्फीअर-३.० सायन्स अँड कॉमर्स फेस्टिवलचे आयोजन केले होते. या फेस्टिवल मध्ये नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तसेच परिसरातील अनेक शाळांनी सहभाग घेतला होता. सिकेटीच्या ध्रुवल दीपक म्हात्रे (



बारावी सायन्स) या विद्यार्थ्याने मोस्फेट आधारित इन्व्हर्टर वितरण आणि शेतीसाठी वापरले जाणारे ड्रोन या विषयावर स्वतः तयार केलेले उपकरण सादर करून प्रात्यक्षिक करून दाखवले.

ध्रुवलने स्वतः तयार केलेल्या उपकरणास प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. के एल इ कॉलेज तर्फे त्याचा ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरव करण्यात आला. या फेस्टिवल मधून हे सिद्ध झाले की शिक्षण हे केवळ वैज्ञानिक संकल्पनांचे आकलन व्यक्त करण्यासाठीचे व्यासपीठ नसून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे, सहकार्य वाढवणे आणि त्यांचा नवोन्मेषी दृष्टिकोन सादर करण्यासाठीही एक उत्तम संधी आहे.

ध्रुवलने मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ,व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख , अध्यक्ष अरुण शेठ भगत , सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, विज्ञान विभाग सहशिक्षक तुकाराम मोरबाले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले

## लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये विशेष कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



विज्ञान कल्पना नाही, सृजनाची प्रेरणा आहे. या विचाराची प्रचीती देणारा आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कलात्मकता व नव कल्पनाशक्तीचा संगम घडवणारा ३.० हा भव्य उपक्रम लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे उत्साहात पार पडला. विज्ञान, गणित आणि कला विभागांच्या संयुक्त प्रयत्नातून साकारलेल्या या प्रदर्शनाने विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला नवी दिशा दिली. हा उपक्रम केवळ एक शालेय प्रदर्शन नव्हता, तर विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेचा, कल्पकतेचा आणि आत्मविश्वासाचा उत्सव ठरला.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शाळेचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर, मुंबईचे विज्ञान अधिकारी नरेंद्र देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय ॲड. आशा भगत, विभागीय अधिकारी मोहन कोंगिरे, ॲड. राहुल भगत, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, बाळासाहेब कारंडे, संतोष चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

३.०मध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून तयार केलेली अनेक विज्ञान प्रयोगमांडणी, गणितीय मॉडेल्स आणि कलात्मक प्रकल्प सादर केले. पर्यावरण संरक्षण, नवीकरणीय ऊर्जा, तंत्रज्ञानाचा सामाजिक उपयोग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या विषयांवरील विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांनी पाहुण्यांना थक्क केले. कला विभागातील विद्यार्थ्यांनी साकारलेल्या सर्जनशील कलाकृतींनी प्रदर्शनाला वेगळीच झळाळी दिली. आपल्या भाषणात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, मुलं त्यांच्या स्वतःच्या जगात रमलेली असतात, पण आपण त्यांना शिक्षणाचे जग दाखवतो. शाळेसाठी मुलं नाहीत, तर मुलांसाठी शाळा आहे. त्यांच्या मनातील जिज्ञासा आणि सृजनशीलता हीच त्यांच्या प्रगतीची खरी पायरी आहे. त्या जिज्ञासेला प्रोत्साहन देण्यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## कामोठे येथे मोफत महाआरोग्य व रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळा ब्रिगेड यांच्या वतीने तसेच मैत्र प्रतिष्ठान आणि एस. पी. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी श्री स्वामी समर्थ मठ, सेक्टर३४, कामोठे येथे मोफत महाआरोग्य शिबिर व भव्य रक्तदान शिबिर मोठ्या उत्साहात पार पडले.

या शिबिरात नागरिकांच्या आरोग्य तपासणीसह ब्लड प्रेशर, शुगर, डॉक्टरांच्या सल्ल्याने हृदयविकार, ई.सी.जी., फुफ्फुस तपासणी, नेत्र तपासणी अशा विविध चाचण्या करण्यात आल्या. तसेच पहिल्या जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. रक्तदात्यांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या.

या प्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून आयोजकांचे कौतुक केले आणि या सामाजिक उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, मावळा ब्रिगेडसारख्या संस्थांनी घेतलेले अशा प्रकारचे आरोग्य उपक्रम समाजात आरोग्य जनजागृतीसाठी प्रेरणादायी आहेत. या वेळी कामोठे शहराध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, डॉक्टर विठ्ठल काळे, बलराज साळोखे अध्यक्ष संदीप वावरे, उपाध्यक्ष योगेश निलख याच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## बीसीटी विधी कॉलेजमध्ये मूटकोर्ट स्पर्धेचे आयोजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात रविवारी प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अंतरमहाविद्यालयीन मूटकोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरुवात संशोधन स्पर्धेने झाली, त्यानंतर मूटकोर्ट स्पर्धेच्या पहिल्या फेरीला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी कायद्याचे सखोल ज्ञान, विवेकपूर्ण मांडणी आणि न्यायालयीन प्रक्रियेचे उत्कृष्ट प्रदर्शन करून उपस्थितांचे लक्ष वेधले. या प्रसंगी न्यायाधीश ऋषिकेश पाटील, न्यायाधीश ओमकार साने, संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव एस.टी. गडदे, प्राचार्य सानवी देशमुख, प्राध्यापक धनश्री कदम, सहाय्यक प्राध्यापक अर्चना खाडवे आणि ॲड. राहुल घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

जे काम आपण निष्ठा आणि ध्येयाने करतो, ते निश्चित यशस्वी होते. मीही एका सामान्य घरातून प्रवास सुरू केला, पण शिक्षण आणि प्रयतकांच्या बळावर आज यशस्वी झालो. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनावर विश्वास ठेवून परिश्रम केले, तर नक्कीच यश त्यांच्या पावलांशी येईल, असे विचार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केले.

या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्थेतील तत्त्वांचे प्रत्यक्ष अनुभव मिळाले असून, भविष्यातील न्यायाधीश आणि वकील घडविण्याचे कार्य बी.सी.टी. विधी महाविद्यालय करत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.





**पनवेल : महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपणाऱ्या युवानाद ढोलताशा पथकाचा १५वा वर्धापन दिन कार्यक्रमात उत्साहात साजरा झाला. या पथकाने मागील १५ वर्षांपासून आपल्या वादनाने ढोल-ताशा रसिकांना मंत्रमुग्ध केले आहे. श्री गणपती मंदिर, पनवेल इंडस्ट्रियल एरिया येथे झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. त्याचप्रमाणे गुरूनाथ लोंढे, प्रथमेश सोमण, जेष्ठ पत्रकार संजय कदम यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पथकाच्या यशाचे विशेष अभिनंदन केले आणि सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# शेतकऱ्यांना पाठबळ

देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया म्हणजे आपला शेतकरी. त्याच्या घामावर देशाची अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य उभे आहे. त्यामुळे केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शेतकऱ्यांना बळ देण्यासाठी अनेक योजना राबवल्या आहेत. अलीकडेच जाहीर झालेल्या डाळ स्वावलंबन अभियान आणि पंतप्रधान धन-धान्य योजना या दोन नव्या उपक्रमांनी या धोरणाला नवचैतन्य दिले आहे.

**भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया, संस्कृतीचा आत्मा आणि समाजाचा केंद्रबिंदू म्हणजे शेती. त्यामुळे कोणत्याही सरकारची खरी ताकद ही शेतकऱ्यांच्या कल्याणात दडलेली असते. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या दशकभरात हे वास्तव ओळखून शेती क्षेत्रात दूरदृष्टीने सुधारणा घडवून आणल्या आहेत. अलीकडेच जाहीर करण्यात आलेल्या डाळ स्वावलंबन अभियान आणि पंतप्रधान धन-धान्य योजना या दोन नव्या उपक्रमांनी शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाची दिशा अधिक स्पष्ट केली आहे. या योजना केवळ आर्थिक मदतीपुरत्या मर्यादित नसून त्या आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नातील आत्मनिर्भर शेतीकडे मोठे पाऊल आहेत. भारत हा जगातील सर्वात मोठा डाळ उपभोक्ता आणि उत्पादक देश आहे. तरीदेखील देशाला दरवर्षी लाखो टन डाळी आयात कराव्या लागतात. यामुळे केवळ परकीय चलनाचा अपव्यय होत नाही, तर शेतकऱ्यांना मिळणाऱ्या संधीही मर्यादित राहतात. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेले डाळ स्वावलंबन अभियान हे अत्यंत महत्त्वाचे आणि दीर्घकालीन धोरण आहे. या अंतर्गत केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे की २०२८पर्यंत भारत पूर्णपणे डाळ उत्पादनात आत्मनिर्भर व्हावा. यासाठी देशभरातील निवडक १५ राज्यांमध्ये 'क्लस्टर ॲप्रोच' वापरला जाणार आहे. म्हणजे प्रत्येक जिल्ह्यात विशिष्ट डाळ पिकाचे उत्पादन वाढवण्यासाठी त्या क्षेत्रात विशेष पायाभूत सुविधा आणि तांत्रिक मदत दिली जाईल. शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे, सिंचनाची सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान आणि हमीभाव यांचा लाभ दिला जाणार आहे. त्याचबरोबर संशोधन संस्था आणि कृषी विद्यापीठांना या मोहिमेशी जोडून नवीन डाळ वाणांची निर्मिती केली जाणार आहे. यामुळे उत्पादनात वाढ होईल, बाजारपेठ मजबूत बनेल आणि देशाचा डाळ आयात खर्च कमी होईल. दुसरी महत्त्वाची योजना म्हणजे पंतप्रधान धन-धान्य योजना. ही योजना केवळ धान्यापुरती मर्यादित नसून शेतीच्या सर्व शाखांना जोडणारी एक व्यापक संकल्पना आहे. यामध्ये धान्य डाळी, फळे, भाज्या, बागायती उत्पादने, मत्स्यपालन, पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय यांचा समावेश आहे. या योजनेचा मुख्य हेतू आहे तो म्हणजे शेतकऱ्यांना उत्पादनापासून ते बाजारपेठेपर्यंत थेट संपर्क साधून देणे. 'फार्म टू फूड प्रोसेसिंग' या संकल्पनेनुसार शेतमालाचे मूल्यवर्धन करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे हे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे. या योजनेंतर्गत 'ॲग्रो प्रोसेसिंग क्लस्टर्स', 'कोल्ड स्टोरेज', 'पॅकेजिंग युनिट्स' आणि 'डिजिटल ई-नाम बाजारपेठा' या सुविधा देशभर उभारल्या जाणार आहेत. शेतकऱ्यांना उत्पादन विक्रीसाठी थेट उद्योगांशी जोडले जाईल. त्यामुळे उत्पादनाला चांगला दर मिळेल, अन्नाचा अपव्यय कमी होईल आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होईल. शेतकऱ्यांसाठी मजबूत पाया मोदी सरकारने गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक योजना राबवल्या आहेत. त्यात काही योजनांनी ग्रामीण भारतात नवा आत्मविश्वास निर्माण केला आहे. शेतीला आधुनिकतेची साथ आणि शेतकऱ्याला सन्मान हाच मोदी सरकारच्या कृषी धोरणांचा खरा गाभा आहे.**

# 'भाताच्या कोठारा'तील बळीराजा अडचणीत!





**खबरबात**
**विजय मांडे**

रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता. कालांतराने जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्र वाढत गेले आणि भात उत्पादन कमी झाले, मात्र कर्जत तालुक्यात कोणतेही औद्योगिक कारखाने नाहीत. त्यामुळे येथील शेतकरी भातपीक मोठ्या प्रमाणात घेत असतात. तालुक्यात दुबार भातशेती आहे. यंदा अवकाळी पावसाने येथील उन्हाळी भातशेतीचे नुकसान झाले. उभे आणि कापलेले भातपीक मातीमोल झाले आणि आता पाऊस लांबल्याने पोटरीवर आलेले पीक खराब झाले. काही पिके जमीनदोस्त झाली. त्यामुळे यंदा उन्हाळ्यातही भातशेतीला फटका बसला आणि आता पावसाळ्यातही भातपीक हातचे गेले. परिणामी शेतकरी अडचणीत आला आहे. कृषी विभागाकडून पंचनाम्यांचे काम सुरू झाले आहे.

तालुक्यात दरवर्षी खरीप हंगामात साडेनऊ हजार हेक्टरमध्ये भातशेतीचे उत्पादन घेतले जाते. यंदा पावसाळा ८ मेपासून सुरु झाल्याने शेतकरीवर्ग गोंधळात सापडला आणि दोन वेळा पेरण्या कराव्या लागल्या. तरीही साडेआठ हजार हेक्टर क्षेत्रात भात पीक घेण्यासाठी शेतकरी राजा सरसवला, मात्र त्यानंतर करपा, खोडकीडा रोग भातावर पडला. त्यामुळे शेतकरी चिंतीत झाला होता. त्यानंतर अतिवृष्टीमुळे काही रोगांना लगाम बसला. अगदी गणेशोत्सवापर्यंत भातपीक चांगले होते. त्यानंतर पावसाने धुमाकूळ घातल्याने हातातोंडाशी आलेले भातपीक जमीनदोस्त झाले.

गेल्या महिन्यात आठ-दहा दिवस पावसाने हैदोस घातल्याने भातपीक धोक्यात आले. ऐन फुलवऱ्याच्या वेळी पावसाने धुमाकूळ घातल्याने परागीकरणाची प्रक्रिया होऊ शकत नाही. त्यामुळे भाताच्या लोंब्या रिकाम्या राहिल्या. त्यात दाणा भरणार नाही. जनावरांना केवळ पेंढा मिळेल. असे वाटत होते, पण पावसाने पुन्हा झोडपल्याने उभे भातपीक पूर्णपणे आडवे झाले आणि शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आली. खरेतर दसऱ्याला नवीन पिकाच्या लोंब्या दरवाजाच्या तोरणाला लावतात. यंदा बहुतांश ठिकाणी भाताच्या लोंब्या तयार नसल्याने दसऱ्याचा सणाला तोरण बांधले, परंतु भाताच्या लोंबीत दाणा नव्हता. त्यामुळे यंदाचे भातपीक हातचे गेल्यात जमा असून शेतकरीवर्ग चिंतेत आहे.

सुमारे पाच महिने पाऊस पडत आहे. अजून एक महिना पाऊस पडणार असल्याचे अंदाज वर्तविले जात होते. त्यामुळे बळीराजाची होती नव्हती ती आशाही आता मावळली आहे. अनेक शेतकरी नुकसानभरपाईची मागणी करीत आहेत. कृषी विभागाकडून नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरुवात झाली आहे. तसे न करता निकष बाजूला ठेवून सरसकट नुकसानभरपाई द्यावी. अशी शेतकरीवर्गाची मागणी आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये भरपाई द्यावी, अशी मागणी काही राजकीय पक्षांकडून करण्यात आली आहे. ती कितपत मान्य होईल. हे सांगता येत नाही, पण लहरी हवामानमुळे बळीराजाचे कंबरडे पार मोडले आहे.

गेल्या मे महिन्यापासून पाऊस पडत आहे. त्यामुळे आमचे तयार झालेले उन्हाळी भातपीक वाया गेले. आता पीक तयार होत असताना अतिवृष्टीमुळे भातपीक जमीनदोस्त झाले. आम्ही शेतकऱ्यांनी कसे जगायचे हा प्रश्न प्रगतशील शेतकरी विनय वेखंडे यांना पडला आहे, तर मे महिन्यात अवकाळी आणि आता अतिवृष्टी यामुळे उभे भातपीक आडवे झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी कसे जगावे असा प्रश्न असताना कर्ज वसुली सुरू आहे. ते कर्ज माफ करावे. शासनाने अन्य भागांप्रमाणे कोकणालाही न्याय द्यावा, अशी कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सभापती विलास थोरवे यांची मागणी आहे. मंडळ कृषी अधिकारी दिनेशकुमार कोळी यांनी, यंदाच्या लहरी हवामानामुळे भातशेतीचे नुकसान झाले आहे. नजर अंदाजाने सातशे हेक्टर जमिनीमधील पीकाचे नुकसान झाले आहे. पिकांचे पंचनामे सुरु करण्यात आले आहेत. प्रत्यक्ष नुकसानीचे क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे, असा अंदाज व्यक्त केला आहे.

एकंदरीत लहरी हवामानामुळे शेतकरी राजा अडचणीत आला आहे. त्याला योग्य नुकसानभरपाई मिळावी ही अपेक्षा आहे. भातपीक घेताना गेल्या अनेक वर्षांपासून भातपिकावर जगणारा शेतकरीवर्ग निराश आहे. शेतीचे कर्ज, खत आणि औषधांचे चढे भाव, मजुरांची वानवा या सर्व अडचणी येत असल्याने जमीन विकण्याकडे शेतकरीवर्गाचा कल वाढला आहे. ग्रामीण भागातील युवक शहराकडे येत असल्यामुळे त्याला भातशेती करण्याची आवड नाही. बहुतांश शेतकऱ्यांची तरुण मुले शेतीकडे जाण्यास तयार नाहीत, कारण भातशेती हा आतबट्ट्याचा व्यवहार झाला आहे. या युवकांना योग्य मार्गदर्शन झाले, तर आपल्याच शेतीत कृषी पर्यटन किंवा रिसॉर्ट करून नव्याने शेतीकडे पाहिल्यास बळीराजा समाधानाने जगू शकेल.

सुदैवाने राज्यातील महायुती सरकार शेतकऱ्यांप्रति संवेदनशील आहे. या सरकारने राज्यातील अतिवृष्टग्रस्त शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीचे पॅकेज जाहीर केले असून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याचा प्रयत्न आहे. तसे झाल्यास शेतकऱ्यांची दिवाळीसुद्धा आनंदात जाईल.



## बदलते तंत्रज्ञान

# जाणून घ्या गुगल पासकी म्हणजे काय?

गुगलने पासकी फिचर खासगी अकाऊंटसाठी सादर केलं आहे. त्यामुळे आता तुम्हाला पासवर्ड न टाकताच गुगल अकाऊंटमध्ये लॉगिन करता येईल.

गुगलनं खाजगी अकाऊंटची सिक्योरिटी वाढवण्यासाठी पासकी फिचर सादर केलं आहे. हे फिचर गेल्यावर्षी रोलआऊट करण्यात आलं होतं आणि आता पर्सनल गुगल अकाऊंटसाठी हा डीफॉल्ट ऑप्शन बनवण्यात आला आहे. पासकीज पासवर्डपेक्षा ४० टक्के फास्ट आहे आणि जास्त सुरक्षितदेखील आहे. गुगल आता युजर्सना अकाऊंटमध्ये साइन इन करण्यासाठी पासकीज बनवण्यासाठी प्रोत्साहित करेल. पासकीज म्हणजे काय? तुमचं डिवाइस अनलॉक करण्यासाठी वापरले जाणारे फिंगरप्रिंट, फेस स्कॅन किंवा पिन म्हणजे पासकीज. 'पासवर्डलेस' भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी गुगलनं ही सिस्टम सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. ह्यामुळे कठीण पासवर्ड लक्षात ठेवण्याचं झंझट राहणार नाही. पासकीजच्या मदतीनं तुम्ही पासवर्ड न टाकता सहज तुमच्या गुगल अकाऊंटमध्ये लॉगिन करू शकता.



गुगल अकाऊंटसाठी पासकी कशी सेटअप करायची गुगल लवकरच युजर्सना पासकीज बनवण्यास आणि वापरण्यास सांगेल. हे फिचर वापरण्यासाठी: तुमच्या गुगल अकाऊंटवर जा आणि 'सिक्योरिटी' टॅब ओपन करा. तिथे तुम्हाला स्टार्ट युजींग पासकीजचा पर्याय दिसेल. त्याची निवड करा आणि तुमच्या डिवाइसचं डीफॉल्ट ऑथेंटिकेशन तुमची पासकी बनेल. ह्यात फेस अनलॉक (फेस आयडी), फिंगरप्रिंट आणि पिनचा देखील समावेश करण्यात आला आहे. जर तुम्ही तुमच्या लॅपटॉप किंवा पीसीवरून एखाद्या वेबसाइटवर लॉगिन करू पाहत असाल तर तुम्हाला तुमचा मोबाइल जवळ बाळगावा लागेल. गुगल तुम्हाला तुमचा फोन अनलॉक करण्यास सांगेल आणि मग तुम्ही वेबसाइटवर साइन इन करू शकाल.

गुगल पासवर्ड पूर्णपणे हटवत नाही आहे आणि हे फक्त नवीन सिक्योरिटी फिचर आहे. त्यामुळे तुम्ही पासवर्ड वापरणं सुरु ठेऊ शकता आणि गुगल अकाऊंटमध्ये 'स्किप पासवर्ड व्हेन पॉसिबल' पर्याय निवडून पासकीज फिचर बंददेखील करू शकता. हा तुमच्या गुगल अकाऊंटमध्ये डीफॉल्ट पर्याय असेल.

# प्रतिभावंत गायक, कलाकार किशोरकुमार

भारतीय चित्रपटसृष्टीचा इतिहास लिहायचा झाल्यास किशोरकुमार या नावाशिवाय तो पूर्णच होऊ शकणार नाही. ६०च्या दशकातील देव आनंदपासून ते ८०च्या दशकातील अनिल कपूरपर्यंतच्या अनेक नायकांना यशाची चव चाखविण्यात किशोरदांचा वाटा मोठा आहे. बॉलीवूडला पहिला सुपरस्टार राजेश खन्ना यांच्या रुपाने मिळाला, त्यामागेही किशोरदांचा खास योडली आवाजच होता हे नाकारून चालणार नाही. या हरहुन्नरी नायक व गायकाचा आज जन्मदिवस. त्यानिमित्त घेतलेला आढावा...



## निमित्त

गायनात तल्लीन होऊन गाणारा गायक म्हणून किशोर कुमार यांची आबालवृद्धांमध्ये ओळख आहे. किशोरदांनी गाण्यात जीव ओतून त्यांना विविध रंग चढवून मैफिली सजविल्या. चित्रपटातही ते चमकले व अभिनयातूनही किशोरदांच्या स्मृती जिवंत आहेत. बारा वर्षाचे किशोरदा रेडिओवर गाणे ऐकून स्वत: त्याच्या धुनांवर थिरकत होते तसेच चित्रपटामधील गीतांची पुस्तके जमा करून त्यातील गीतांना वेगळ्या शैलीत घरी आलेल्या पाहुण्यासमोर अभिनयासह सादर करत व त्यांच्याकडून बक्षीसही मागून घेत असत.

किशोरदांनी वडीलबंधू दादा मुनी उर्फ अशोककुमार व अनुपकुमार यांचे बोट धरून स्वत:चे नशीब अजमावण्यासाठी चित्रपटातील अभिनयातून करियरचा श्रीगणेशा केला. त्या वेळी चित्रपटसृष्टीत अभिनेत्यांमध्ये सर्व गुण पाहिले जात होते. त्यात अभिनेत्याला गायनाच्या कसोटीमधूनही जावे लागत होते.

१९५० साली आभास कुमार व कुंजालाल गांगुली यांनी किशोर कुमारला 'मुकद्दर'मध्ये काम दिले. त्यात किशोरदाचा रोलही तसा चांगलाच होता, मात्र त्यात त्यांना गायनाची संधी मिळाली नाही. त्यानंतर १९५१मध्ये किशोरदा हे मन्नाडे यांच्यासह गायलेच. १९५६मध्ये नऊ चित्रपट करणारा अभिनेता म्हणून त्यांनी त्यांची नवीन ओळख जगाला करून दिली. किशोरदाने आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपटसृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन व संगीताच्या तालावर थिरकणे या त्रिवेणी कलांचा संगम असलेल्या किशोरदांनी दर्शकांसह श्रोत्यांवर भुरळ घातली. नायकासह गायक यांच्या भूमिकेने तर दर्शकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर त्यांनी मीना कुमारी, वैजयंती माला, निम्मी, कामिनी कौशल, मधुबाला, नूतन, माला सिन्हा व बीना रॉय यांच्यासारख्या नायिकांसोबत चित्रपट केले. अभिनयासह त्यांनी या चित्रपटामध्ये गायनाची दुहेरी भूमिका केल्याने तर त्यांनी त्यांचे नाव यशाच्या शिखरावर पोहचविले. 'मेरा नाम अब्दुल रहमान', 'नखरे वाली', 'कुंएँ मे कुद जाना यार पर शादी मत करना', 'इना मीना डिका', 'हम तो मोहब्बत करेगा', 'पाच रुपया बारा आणा' अशा एक ना अनेक गीतांमधून किशोरदा आपल्यात आहेत.

एके दिवशी अशोक कुमार यांच्या घरी अचानक संगीतकार सचिनदेव बर्मन आले. तेव्हा बाथरुममध्ये असलेल्या किशोरदांचे स्वर त्यांच्या कानी पडले. 'कौन गा राहा है?' असे त्यांनी दादामुनींना विचारले. त्यावर अशोककुमार यांनी मोठ्या गायकाची ओळख करून दिली. तेव्हा बर्मनने 'बाथरूम सिंगर' किशोरदाला ओळखले. तेव्हापासून सुमधुर गीतांचा झरा किशोरदांच्या कंठातून वाहायला प्रारंभ झाला. त्यांनी त्याच्या चित्रपटासाठी केवळ गीते लिहिली नाही, तर संगीतही दिले. 'चलती का नाम गाडी', 'बढती का नाम दाढी', 'जमीन', 'दूर का राही', 'झुमरू' आदी चित्रपट किशोरदांनी दर्शकांना नव्या रूपात दिले. **(साभार : मराठी वेबदुनिया)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रात्री झोप लागत नाही? मग हा सिक्रेट उपाय करा

डोळ्यांची काळजी घेणं अत्यंत महत्त्वाचं आहे. असं का? कारण आजकाल कोणतंच काम फोनशिवाय होत नाही. फोनने असं काय होतं? आपण किती वेळ फोन हातात घेतो, स्क्रीन टाईम किती असतो याकडे आपण अजिबात लक्ष देत नाही. डोळे हा सर्वांत नाजूक अवयव आहे त्यामुळे त्याची काळजी आवर्जून घ्यायला हवी. काय करता येऊ शकतं? बघूयात...



आजकाल कुठलंच काम मोबाईल, लॅपटॉप शिवाय होत नाही. अगदी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत बरेचजण आपला खूप वेळ स्क्रीनवर घालवतात. चष्मा लागण्याचं हे मुख्य कारण आहे. स्क्रीनटाइम कमी केल्यास सगळं सहज शक्य आहे. तासन्तास स्क्रीनसमोर काम करत असाल, तर अर्ध्या तासाच्या अंतराने १० ते २० सेकंद डोळे बंद करून विश्रांती घ्या.

धूम्रपान करू नये हे तर आपण ऐकतच आलोय, पण या धुम्रपानामुळे डोळे सुद्धा कमकुवत होतात हे मात्र फार कमी लोकांना माहितेय. धूम्रपान केल्याने काचबिंदू, मोतीबिंदू यांसारख्या डोळ्यांशी संबंधित आजारांचा धोका वाढतो.

मासे, शेंगदाणे, हिरव्या पालेभाज्या यामुळे डोळ्याचं आरोग्य सुधारतं. चांगला आहार घेतल्यास तो डोळ्यांसाठी खूप चांगला असतो. व्हिटॅमिन ए, ओमेगा ३ फॅटी ॲसिड, ल्युटिन, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई सारखे पौष्टिक पदार्थ डोळ्यांच्या दृष्टीसाठी खूप फायदेशीर असतात.

आपण डोळ्यांच्या तपासणीत हलगर्जीपणा करतो. दर सहा महिन्याला डोळ्यांची तपासणी करायला हवी. वेळच्या वेळी तपासणी केली तर डोळ्यांच्या संबंधित कुठली समस्या असेल तर ती कळून चुकते.

मधुमेह, रक्तदाब या आजारांमुळे डोळ्यांची समस्या उद्भवते. रक्तदाब आणि मधुमेह असेल तर डोळ्यांची दृष्टी कमकुवत होते. डोळ्यांची नियमित तपासणी करून घ्यावी. या तपासणीत मुख्यतः या दोन आजारांची तपासणी न चुकता करावी.

# खोपोली-नेरळ रेल्वेमार्गावर जम्बो मेगाब्लॉक; प्रवाशांचे झाले हाल!

**खोपोली : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेवरील खोपोली कर्जत ते नेरळ या मार्गावर जम्बो मेगा ब्लॉक घेण्यात आल्याने प्रवाशांचे अतोनात हाल झाले . कर्जत येथे कर्जत पनवेल मार्गासाठी तातडीचे काम रेल्वे प्रशासनाने हाती घेतल्याने हा मेगा ब्लॉक घेण्यात आला आहे.



पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात मेगा ब्लॉक घेतल्याने खोपोलीतून मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांचे अतोनात हाल होत आहे. नेरळ, बदलापूर व अंबरनाथ या ठिकाणाहून मुंबईकडे जाणाऱ्या गाड्या सुटणार आहे. असेही सांगण्यात येत आहे.खोपोलीतून कर्जत कडे एसटी बस सेवेची व्यवस्था करण्यात आली तरी यासाठी पैसा व वेळ मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याचे प्रवाशांकडून सांगण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मुंबईला थेट जाणाऱ्या प्रवाशांनी पनवेल मार्गे जाणे पसंत केले असल्यानेही वेळ व पैसा मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे.

खोपोली व परिसरातील खेड्यापाड्यातून विद्यार्थी वर्ग खोपोलीला शाळा व महाविद्यालयात येत असतो, त्याचप्रमाणे ग्रामस्थ ही आपल्या दैनंदिन कामासाठी येत असतात नेहमीच गजबजलेल्या खोपोली रेल्वे स्थानकावर पूर्ण शुकशुकाट स्मशान शांतता पसरली आहे. शनिवारी सुरू झालेला मेगाब्लॉक मंगळवार पर्यंत असल्याचे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे. मंगळवारी दुपारी एक वाजून ४८ मिनिटांची पहिली लोकल मुंबईकडे रवाना होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

### पोलादपूर पंचायत समितीच्या गणांची आज आरक्षण सोडत

**पोलादपूर :** पोलादपूर तालुका पंचायत समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीची तयारी प्रशासनाच्या पातळीवर पूर्ण वेगाने सुरू झाली आहे. पंचायत समितीच्या चार गणांचे आरक्षण सोडतीद्वारे काढण्यासाठी सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शहरातील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पोलादपूर तहसिलदार कपिल घोरपडे यांनी दिली आहे.

पोलादपूर पंचायत समितीच्या मागील निवडणुकीत सदस्यांचे आरक्षण आधी जाहिर होऊन नंतर सभापती पदाचे आरक्षण जाहिर झाले होते. त्यावेळी निवडून आलेल्या चारही पंचायत समिती सदस्यांच्या प्रवर्गापेक्षा सभापती पदासाठी भिन्न आरक्षण जाहिर झाल्याने पुन्हा आरक्षण जाहिर करण्याची नौबत प्रशासनावर ओढवली होती.

# माणगावमधील कशेणे येथील ग्रामस्थांचा राष्ट्रवादीत पक्षप्रवेश

**माणगाव : प्रतिनिधी**

कशेणे गावातील ग्रामस्थांचा पक्षप्रवेश उद्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खा.सुनील तटकरे यांनी कशेणे येथील पक्षप्रवेश कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. माणगाव तालुक्यातील इंदापूर विभागातील कशेणे ग्रामस्थांचा पक्षप्रवेश कार्यक्रम शनिवार दि. ११ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३ वा. खा.सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात खा.तटकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते शेखरशेट देशमुख,गजानन अधिकारी,पक्षाच्या राज्य प्रवक्त्या अँड.सायली दळवी,तालुकाध्यक्ष काका नवगणे,प्रदेश युवक सचिव दिपकशेट जाधव,जिल्हा युवक राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष उदय अधिकारी,रातवड सरपंच सतीश पवार,महेश महाजन,राष्ट्रवादी महिला आघाडी तालुका उपाध्यक्ष श्रद्धा यादव,सरपंच वनिता जाधव,उपसरपंच कृपा दळवी,इंदापूर - कशेने व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष मनोज जैन,सचिव समीर मेहता,नितीन घोणे,संजय दळवी,शुक्रादास मोरे,तालुका युवक राष्ट्रवादीचे अध्यक्ष रुपेश तोडकर,मेघनाथ सातपुते,महेंद्र गायकवाड,साहिल गायकवाड ,सचिन नाडकर आदींसह पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते,ग्रामस्थ व महिलामंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना खा.तटकरे यांनी सुरवातीलाच कशेणे गावातील प्रवेश करणाऱ्या सर्व ग्रामस्थांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत केले. खा. तटकरे पुढे म्हणाले कि,इंदापूर विभाग हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला असून यापुढेही बालेकिल्लाच राहील. कशेणे गावातील जी प्रलंबित विकासकामे असतील ती आपण निश्चितच मार्गी लावू. येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत पक्षाच्या पाठीशी ताकद उभी करा असे आवाहन त्यांनी केले.

# माणगाव तालुका आमन कमिटीची टेमपाले येथे बैठक

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील टेमपाले गावात माणगाव तालुका आमन कमिटीची (आमन फाऊंडेशनची) बैठक रविवार दि.१२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. कमिटीचे अध्यक्ष मुक्तार डावरे,उपाध्यक्ष अस्लम राऊत,सचिव लियाकत राऊत,सहसचिव शौकत रोहेकर,खजिनदार इकबाल हुरजूक,गोरेगाव सरपंच जुबेर अब्बासी,मुफ्ती मुजफ्फर सैन,अल्ताफदादा धनसे व दक्षिण रायगडातील विविध तालुक्यांतील विविध गावातील मोहल्ला अध्यक्ष यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाली. यावेळी उपस्थित कमिटीच्या सर्व पदाधिकारी तसेच मुस्लिम समाजाचे जेष्ठ मंडळी यांचे टेमपाले गावचे अध्यक्ष अब्दुल अजीज गजगे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या बैठकीत जन्म दाखले काढण्याबाबत मुस्लिम बांधवांची सकारात्मक चर्चा झाली. बैठकीत अविष्कार फाउंडेशनतर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झालेले कमिटीचे सचिव लियाकत राऊत यांचा कमिटीच्यावतीने यथोचित सत्कार करण्यात आला.



सदर बैठकीत सरकारने सर्वांना अनिवार्य केलेल्या जन्म दाखले काढण्यासाठी कोणकोणती कागदपत्रे लागतात त्यासाठी काय करावे याबाबत चर्चा करण्यात आली. यासाठी उपस्थित काही मुस्लिम बांधवानी याकरिता गावपातळीवर कमिटी तयार करून त्यांना याबाबत मार्गदर्शन करून गावातील लोकांची जन्म दाखले तयार करण्यासाठी लागणारी कागदपत्रे जमा करावी असे ठरले असून काही मुस्लिम बांधवानी हा दाखला काढण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे व त्या संबंधित असणारे तलाठी,अंगणवाडी सेविका,पोलीसपाटील अशा लोकांची गावात शिबीर आयोजित केली तर हे दाखले काढण्यासाठी अधिक सुलभता मिळेल तसेच ग्रामपंचायतीत,नगरपंचायतीत आपल्या जन्माची नोंद असल्याची रेकॉर्ड मिळण्याबाबत आपण संबंधितांकडे लेखी अर्जाद्वारे मागणी केली असल्याचे सचिव लियाकत राऊत यांनी सांगून याकरिता जेवढ्या फाईल असतील त्याचा खर्च गावपातळीवर प्रत्येक गावाने करून आपला जन्म दाखला मिळवावा. तहसीलदार यांच्याकडील कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर अशा लोकांना जन्माचा दाखला मिळू शकेल.

# समर्थ नेत्रालयाचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन



**चौक : प्रतिनिधी**

वैद्यकीय सेवा ही व्यवसाय हे ध्येय न ठेवता प्रामाणिक काम करताना प्रत्यक रुग्णांची समर्थ सेवा करणे म्हणजेच समर्थ नेत्रालय हॉस्पिटल असे गौरव उदगार माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांनी काढले आहेत.

सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. विशालाक्षी व डॉ अर्चिस शेडबाळे यांच्या मोहपाडा रसायनी येथील सुसज्ज अत्याधुनिक व आंतरराष्ट्रीय दर्जाचे व सर्व अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज नेत्र चिकित्सक हॉस्पिटलचे उद्घाटन करताना ते बोलत होते.१४ वर्ष डॉ.विशालाक्षी व डॉ. अर्चिस यांनी हजारो नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया केल्या असून आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी मिळाली आहे. यावेळी सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ.सुहास हळदीपूरकर व डॉ संदीप डोळे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विशालाक्षी यांची नेत्र तपासणी कारकिर्द सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या आई बाबा यांची कृतज्ञता व्यक्त करताना त्यांच्या डोळ्यात पाणी आले.

**रोहा अष्टमी नगर परिषद**
ता. रोहा, जि. रायगड पिन कोड- ४०२१०९.
फोन नं. कार्यालय-०२१९४-२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४-२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

**जाहिर ई-लिलाव सुचना**

रोहा नगर परिषद हद्दीतील रोहा नगर परिषदेकडे असलेले (वापरात नसलेले) मटेरिअल घेऊन जाणे. या कामाची ई-निविदा सूचना शासनाच्या https://www.eauction.gov.in या संकेतस्थळावर (बेवसाईटवर) दिनांक. १३/१०/२०२५ रोजी ऑनलाईन प्रसिद्ध करणेत आलेली आहे. याबाबतची सविस्तर सूचना व त्या संबंधित निविदेच्या अटी व शर्ती वरील नमूद केलेल्या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

रो.न.प/जा.क्र. ई-लिलाव/ ११७/२०२५-२६
दिनांक :- १०/१०/२०२५

सही/-
(अजयकुमार एडके)
मुख्याधिकारी
रोहा नगर परिषद

# मुठवली तर्फे तळे गावाच्या विकासासाठी आम्ही सारी मंडळी सज्ज -खासदार तटकरे

## आदिवासीवाडी येथील साकवाचे उदघाटन; सुविधा उपलब्ध

**माणगाव : प्रतिनिधी**

मुठवली तर्फे तळे गावातील विकास कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील. या गावाच्या विकासासाठी आम्ही सारी मंडळी सज्ज असल्याचे प्रतिपादन रायगड - रत्नागिरी लोकसभा मतदारसंघाचे खा.सुनील तटकरे यांनी मुठवलीतील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.



माणगाव तालुक्यातील इंदापूर विभागातील मुठवली तर्फे तळे आदिवासीवाडी येथील साकवाचे उदघाटन शनिवार दि. ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वा. खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते संपन्न झाले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात खा.तटकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते शेखरशेट देशमुख,गजानन अधिकारी,पक्षाच्या राज्य प्रवक्त्या अँड.सायली दळवी,तालुकाध्यक्ष काका नवगणे,प्रदेश युवक सचिव दिपकशेट जाधव,जिल्हा युवक राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष उदय अधिकारी,रातवड सरपंच सतीश पवार,महेश महाजन,राष्ट्रवादी महिला आघाडी तालुका उपाध्यक्ष श्रद्धा यादव,सरपंच वनिता जाधव,उपसरपंच कृपा दळवी,इंदापूर - कशेने व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष मनोज जैन,नितीन घोणे,संजय दळवी,शुक्रादास मोरे,सचिन नाडकर आदींसह पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते,ग्रामस्थ व महिलामंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना खा.तटकरे पुढे म्हणाले कि,मतांचे राजकरण कधीच आम्ही आमच्या राजकीय आयुष्यात केले नाही. जे - जे करायचे ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून करायचे. या गावाने वेगवेगळ्या निवडणुकांच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठीशी नेहमीच ताकद उभी केली. या गावातील विकास कामांना पुढील काळात चालना देऊ. हे गाव संवेदनशील असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचाराचा आहे. येणाऱ्या सर्व निवडणुकांत हे गाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठीशी १०० टक्के ताकद उभी करील असा विश्वास यावेळी खा.तटकरे यांनी व्यक्त केला.

# मध्य रेल्वे पथकाकडून गुन्हेगारांवर कारवाई

**रोहे प्रतिनिधी**

मध्य रेल्वे दक्षता पथकाने तिकिटांचे हस्तांतरण, दलालीच्या कृती आणि बनावट ओळखपत्रे आणि बनावट तिकिटांवर प्रवास यासारख्या बेकायदेशीर तिकिटे खरेदी करण्याच्या पद्धतींवर सतत लक्ष ठेवले आहे. जानेवारी २०२५ ते मे २०२५ पर्यंत, मध्य रेल्वे वाहतूक दक्षता पथकाने अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विविध ठिकाणी आठ प्रतिबंधात्मक तपासणी केल्या.

फेब्रुवारी २०२५ मध्ये अंबरनाथ सॉफ्टवेअरच्या माध्यमातून बेकायदेशीर ई-तिकीट विक्री उघडकीस आली; ८ तिकीटांची एकूण किंमत रु.१२०००/- आणि १३ IRCTC आयडी जप्त करण्यात आले. FIR नोंदवली असून सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शनानुसार प्रकरण बंद करण्यात आले. कोल्हापूर ४ तिकिट दलालांना रु. २५,५५७/- किंमतीच्या ४ तिकीटांसह अटक. संबंधित कायद्यांतर्गत प्रकरण नोंदवले.मार्च २०२५ मध्येपुणे डेक्कन जिमखाना झठड येथे ३ तिकिट दलालांना रु १०.५२०/- किंमतीच्या ३ गउठ तिकीटांसह पकडले. कायदेशीर कारवाईसाठी ठझऋ कडे सुपूर्द करण्यात आले.सिस्टमचा गैरवापर (२४.०३.२०२५): रिझर्वेशन क्लर्कने वैयक्तिक फायद्यासाठी तिकिट प्रिंट न करता सिस्टममध्ये जारी केले. मोठी चार्जशीट जारी करण्यात आली.एप्रिल २०२५ मध्ये ट्रेन क्र. ११०५५ मध्ये दोन प्रवाशांना खोट्या ओळखपत्र आणि हस्तांतरित तिकीटांसह प्रवास करताना आढळले. दोघांनाही रेल्वे नियमांनुसार दंड करण्यात आला. मे २०२५ मध्ये

रेल्वे कर्मचारी नसलेले दोघेजण प्रिव्हिलेज पासचा वापर करून बुक केलेल्या प्रवासी आरक्षण केंद्रातील तिकीटांसह ट्रेन क्र. १२७४१ मध्ये प्रवास करताना पकडण्यात आले. दोघांनाही रु. १०,९९०/- दंड देण्यात आला. पुढील चौकशी सुरू आहे.

मलकापुर मोठ्या प्रमाणावर तिकीट दलालीची साखळी उघडकीस आली; २ व्यक्तींना रु १०.०९ लाख किंमतीच्या १८२ JCR तिकीटांसह अटक करण्यात आली.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी **मौजे शिलार,** ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहेत, या मिळकतींचे मालक श्रीकांत नामदेव पाटील, यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३७/२ | ००-८७-०० है. आर. पॉ. या एकूण क्षेत्रापैकी श्रीकांत पाटील यांचे मालकीचे ००-२७-०० हे.आर. पॉ. | ०-०५ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्बेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणा-या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १३ ऑक्टोबर २०२५**

सही/-
**ॲड. शरद आर. सावंत**
**बी. कॉम.एल.एल.बी.**

**पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१ मो. नं. ९५२७२८२५२५**

सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**

**(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९), सहित महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२(७) अन्वये)**

**प्रारंभिक नगर रचना परियोजना नैना क्र. १०**

**शिवकर (भाग), चिखले (भाग), कोळखे (भाग), कोळखे पेठ (भाग), कोन (भाग), डेरवली (भाग) आणि पळस्पे (भाग)**

ज्याअर्थी, प्रारूप नगररचना परियोजना नैना क्र. १०, शिवकर (भाग), चिखले (भाग), कोळखे (भाग), कोळखे पेठ (भाग), कोन (भाग), डेरवली (भाग) आणि पळस्पे (भाग), ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र. १०३/१७/नवि-१३, दि. १३ सप्टेंबर २०१७ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८च्या पोट-कलम (२) अन्वये त्यांची अधिसूचना क्रमांक सिडको/नैना/टीपीएस-१०/प्रा.यो./ २०२४ दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग-२ मध्ये २७ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिध्द झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगरविकास विभागाने श्री. अभिराज गिरकर, निवृत्त सह संचालक, नगररचना यांची नेमणूक उक्त अधिनियमांच्या पोट-कलम (१) कलम ७२ प्रमाणे उक्त मंजूर प्रारुप परियोजनेसाठी लवाद म्हणून अधिसूचना क्र. टीपीएस-१२२४/८२१/ प्र.क्र.५८ /२४ /नवि-१२, दि. १२ जुलै २०२४ अन्वये केली आहे व सदर अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्र भाग १ मध्ये दि. ०८-१४ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३ (१) अन्वये दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी सूचना प्रसिद्ध करून नगररचना परियोजना नैना क्र. १० [शिवकर (भाग), चिखले (भाग), कोळखे (भाग), कोळखे पेठ (भाग), कोन (भाग), डेरवली (भाग) आणि पळस्पे (भाग)] करीता लवाद म्हणून कर्तव्ये पार पाडण्याचे काम दि. ५ सप्टेंबर २०२४ पासून सुरू करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, विहित केलेल्या नमुना क्रमांक ४ मधील विशेष सूचना उक्त नगररचना परियोजनेमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व जमीन मालकांना देण्यात आलेल्या असून त्यांची या संदर्भातील सुनावणी पूर्ण करून त्याबाबतची टिपणे नोंदविण्यात आलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, नगररचना परियोजना नैना क्र. १०. भाग शिवकर (भाग), चिखले (भाग), कोळखे (भाग), कोळखे पेठ (भाग), कोन (भाग), डेरवली (भाग) आणि पळस्पे (भाग)। हिची उक्त अधिनियमांच्या पोट-कलम (३) कलम ७२ नुसार दि. २९ एप्रिल २०२५ रोजी नोटीस क्र. ARB/TPS-10/GEN/2025/686 अन्वये प्रारंभिक योजना व अंतिम योजना अशी उपविभागणी करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियमांमधील नियम क्र.१३ प्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण करून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट-कलम (४) मधील कर्तव्ये पार पाडण्यात आलेली आहेत.

त्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार नगररचना परियोजना नैना क्र. १०, शिवकर (भाग), चिखले (भाग), कोळखे (भाग), कोळखे पेठ (भाग), कोन (भाग), डेरवली (भाग) आणि पळस्पे (भाग) या योजनेचे लवाद म्हणून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट-कलम (७) प्रमाणे तसेच उक्त नियमांचा नियम क्र. १३(९) प्रमाणे ही परियोजना दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी तयार करण्यात आली आहे असे जाहीर करीत आहेत.

ही प्राथमिक परियोजना निम्नस्वाक्षरीकार लवाद यांच्या कडून तयार करण्यात आल्यानंतर जनतेच्या तसेच या परीयोजनेत समाविष्ट झालेल्या जमीनींच्या मालकांच्या अवलोकनार्थ लवादांच्या व नैनाच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सीबीडी बेलापूर- नवी मुंबई ४०० ६१४ येथे प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिनांक: १८ सप्टेंबर, २०२५
**पत्ता :** नैना कार्यालय, टॉवर नं. १०, आठवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सी.बी.डी. बेलापूर-नवी मुंबई ४००६१४

**अभिराज गिरकर**
**नगर रचना परियोजना, नैना क्र. १०,**
**भाग शिवकर (भाग), चिखले (भाग), कोळखे (भाग), कोळखे पेठ (भाग), कोन (भाग), डेरवली (भाग) आणि पळस्पे (भाग)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२९५/२०२५-२६

# पनवेल मनपा क्षेत्रात दैनिक बाजार बांधकामाकरिता भूखंड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती अ (खारघर), ब (कळंबोली), क (कामोठे), ड (पनवेल)मधील विविध भूखंडांवर दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सिडको प्राधिकरणाकडून दैनिक बाजार बांधकामाकरिता भूखंड उपलब्ध झाले आहे. बऱ्याच काळापासून या भूखंडांवर तात्पुरत्या बांधकामासह बाजारपेठा सुरू आहेत. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार, या ठिकाणी नव्याने कायमस्वरूपी



बांधकाम करून दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित आहे. ज्यामुळे नागरिकांना बाजारांची चांगली सहजपणे व सोयीस्कर सुविधा उपलब्ध होणार आहे.

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील खारघर प्रभाग अ मध्ये सेक्टर ३,४,६,११,१२,१५ व २० मधील एकूण १७ ठिकाणी गरजेनुसार विविध ओटे संख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे. दैनिक बाजारांसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आधिक मंजुरीदेखील मिळाली आहे. काही दिवसांमध्ये काम पूर्ण होऊन नागरिकांच्या सेवेत प्रशस्त, रेखीव असे दैनिक बाजार उपलब्ध होणार आहेत. कळंबोली प्रभाग मध्य सेक्टर २, २६, ५, ६, १०, १२, १४, १५ मध्ये १६ ठिकाणी ओटेसंख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे.

या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळाली आहे. पनवेलमध्ये फेरीवाल्यांची गणना झाली आहे, मात्र अनेक फेरीवाल्यांकडे हक्काचा निवारा नसल्याने रस्त्यावर व्यवसाय करावा लागतो. त्यांना जागा उपलब्ध होणार आहेत.

# भाजप कार्यकर्त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीचा आनंद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नरेंद्र मोदी सलग तिसर्यांदा देशाचे पंतप्रधान झाले आहेत. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगतात एक शक्तिशाली व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. कमालीची क्रेझ असणार्या देशाच्या पंतप्रधानांची भेट घेण्याचे अनेकांचे स्वप्न असते असे म्हटले तर वावगे ठरू नये, बुधवारी रसायनी परिसरातील भाजपच्या स्थानिक पदाधिकार्यांची ही इच्छा नेत्यांनी पूर्ण केली. त्यामुळे त्यांना आनंद झाला असल्याचे भाजपचे वासांबे जिल्हा परिषद अध्यक्ष सचिन तांडेल यांनी सांगितले



पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना भेटण्याचे माझ्या आयुष्यातील एक स्वप्न पूर्ण झाले . त्यांच्या व्यक्तीमत्त्वातील तेज, देशासाठीची निष्ठा आणि अद्वितीय कार्यतत्परता पाहून मन भारावून गेले. अशा महान नेत्याच्या सान्निध्यात काही क्षण घालवण्याचा हा सन्मान आयुष्यभर लक्षात राहणारी आठवण ठरेल. या भेटीतून मला समाजकार्य आणि राष्ट्रसेवेच्या वाटचालीस नवी ऊर्जा, नवा आत्मविश्वास लाभला आहे.

आमदार महेश बालदी साहेबांमुळे हा योग घडून आला. भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती घेतल्यापासून एकनिष्ठा, कट्टर आणि निष्ठावान कार्यकर्ता राहिल्याने आज मला हे भाग्य लाभले.

# महाराष्ट्रातील प्रत्येकाने अभिजात मराठी भाषेचा अभिमान बाळगायला हवा - प्रा.डॉ. धारुरकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या निर्देशानुसार दिनांक ३ ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेद्वारे करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत आज पनवेल महानगरपालिका व शासकीय अध्यापक विद्यालय, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने त्रिपुरा सेंट्रल युनिव्हर्सिटीचे माजी कुलगुरू प्राध्यापक डॉ.विजय धारुरकर यांचे 'अभिजात मराठी भाषेचे सौंदर्य आणि नवी दिशा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



अभिजात मराठी भाषेच्या प्रचार, प्रसार व गौरवासाठी आयोजित केलेल्या या व्याख्यानात धारूरकर यांनी मराठी भाषेचा इतिहास व संस्कृती उलगडून सांगत अभिजात मराठी भाषेचे महत्व स्पष्ट केले. कवी मुकुंदराज यांच्या विवेकसिंधू पासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या भाषाकोष व आज्ञापत्रांपर्यंत माहिती देत मराठी भाषेच्या वापराचे महत्व त्यांनी सांगितले. कवी कालिदास यांची काव्यशैली, श्रीचक्रधरस्वामी यांचे लीळाचरित्र याबाबत देखील महत्वपूर्ण भाष्य त्यांनी केले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांची मराठी भाषाशुद्धी चळवळ, पु. ल. देशपांडे यांचे लेखन, कवी कुसुमाग्रज आणि मराठी साहित्यिकांचे योगदान याबाबत महत्वपूर्ण व तपशीलवार माहिती यावेळी प्रा. धारूरकर यांनी श्रोत्यांना दिली.

पनवेल येथील शासकीय अध्यापक विद्यालय येथे आयोजित या कार्यक्रमास पनवेल महानगरपालिकेच्या उपायुक्त मंगला माळवे, शासकीय अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्या प्रा.डॉ.रमा भोसले, नगरसचिव अक्षय कदम, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, प्रा. बिजली दडपे, प्रा. प्रियांका सुभेदार, प्रा.नीलिमा मोरे, प्रा. उज्वला डोने, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन कार्तिकी सोनटक्के यांनी केले.

# गव्हाण विद्यालयाच्या क्रीडा समितीचा खेळाडू व पालकांशी संवाद

**गव्हाण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये विविध क्रीडा स्पर्धेतील सहभागी खेळाडू व पालकांची सहविचार सभा शुक्रवार दि.१० ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न झाली.

शासकीय क्रीडा स्पर्धेत खेळाडूंनी सहभाग घेऊन स्पर्धेत यशस्वी होऊन आपले व शाळेचे नाव उज्वल करावे यासाठी या विशेष सभेचे आयोजन करण्यात आले.प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर,उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील,क्रीडा शिक्षक सुरेश पारखे,खेळाडू व त्यांचे पालक उपस्थित होते.



प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे व क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांचे अभिनंदन केले. तसेच दिवाळी सुट्टीत होणाऱ्या क्रीडा स्पर्धासाठी खेळाडूंना व पालकांना मार्गदर्शन केले. स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी खेळाचे सर्वोत्तम प्रदर्शन करण्याचे आवाहन करतानाच या स्पर्धेत अनेक माजी विद्यार्थी व पालकांचे विशेष सहकार्य लाभल्याचा आवर्जून उल्लेख केला व विद्यालयाच्या वतीनेही कसलीही कमतरता भासणार नाही अशी ग्वाही दिली.

उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी खेळाडूंना उत्तेजन देण्यासाठी पालकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले.पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनी खेळाडूंनी उत्तम सराव सराव करून स्पर्धेत यशस्वी होण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी आतापर्यंत क्रीडास्पर्धेत खेळाडूंनी मिळवलेल्या यशाबद्दल सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून शासकीय क्रीडा स्पर्धेचे शैक्षणिक व आरोग्यविषयक महत्त्व अधोरेखित केले व उपस्थितांचे आभार मानले.

# घणसोली येथील बेघर निवारा केंद्रात सामाजिक कृतज्ञता कार्यक्रम

## साहित्याचे वाटप

**नवी मुंबई : बातमीदार**

१० ऑक्टोबर या जागतिक बेघर दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या घणसोली येथील शहरी बेघर निवारा केंद्रामध्ये सामाजिक कृतज्ञता कार्यक्रम संपन्न झाला. नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली हा कार्यक्रम समाजविकास विभागाच्या उपायुक्त नयना ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाप्रसंगी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने केंद्राकरिता टेलिव्हिजन, वॉशिंग मशीन, सीसीटीव्ही, लॉकर, योगा मॅट, फ्रिज इ. साहित्याचे वाटप करण्यात करण्यात आले. यावेळी स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाचे महाव्यवस्थापक राजेश कुमार, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे सहआयुक्त शंकर गोरे, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या उपआयुक्त प्रणाली घोंगे आदी मान्यवर उपस्थित होते. नवी मुंबई महानगरपालिका या बेघर निवारा केंद्राच्या माध्यमातून चांगले काम करीत असल्याबद्दल मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

# ज्येष्ठ नागरिकांसमवेत कृतज्ञता संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेमार्फत येत्या १५ ऑक्टोबरला बुधवारी ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता संवादाचे आयोजन पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे.

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात या विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या जेष्ठ नागरिक दिनाच्या औचित्याने उपरोक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवारी दि.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी व प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिराने होईल. त्यासोबतच ज्येष्ठ वर्गाला होत असलेला सायबर धोका लक्षात घेता पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी यांचे ज्येष्ठांची सायबर फसवणूक संदर्भात चर्चासत्र होईल.तसेच जेष्ठ नागरिकांसाठी उपयोगी ठरणाऱ्या कायद्यांविषयी व्याख्यानाचे आयोजन यावेळी करण्यात आले आहे. ज्येष्ठांसाठी विविध गुणदर्शन ज्येष्ठ मंडळीच्या सुप्त कला-गुणांना वाव देण्यासाठी त्यांना हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी, त्यांनीच बसवलेला विविध गुणदर्शन कार्यक्रम यावेळी नाट्यगृहात होईल. यात नृत्य, नाटक, गीत, मिमिक्री, नक्कल, काव्यवाचन, एकपात्री अभिनय, अशा कला ज्येष्ठ नागरिक मंडळी सादर करतील. याचबरोबर संगीत रजनीचेही आयोजन करण्यात आले आहे.

तसेच जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरिक संघांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार केला जाईल. या कार्यक्रमास पनवेल महानगरपालिका हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांनी आवर्जून मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पनवेल महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

विविध गुणदर्शन कार्यक्रमात ज्या ज्येष्ठांना सहभाग घ्यायचा आहे त्यांनी आपला सहभाग,कलाप्रकार जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी मोबाईल क्रमांक ७७१५८१५१२७ यांच्याकडे १४ ऑक्टोबर सायंकाळी पाच वाजेपर्यंत नोंदवावा.

# रसायनीत तब्बल ५० तास पाणीपुरवठा बंद; टँकरची सुविधा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळ महानगर गॅस पाइपलाईनचे काम सुरु असताना एमआयडीसी जलशुध्दीकरण केंद्राची पाईप लाईन फुटल्याने गेल्या सहा दिवस हजारो लिटर पाणी रस्त्यावरुन वाया जात होते.

ही परिस्थिती पाहता पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी दोन दिवसांत या पाईपलाईंनचे काम न झाल्यास पत्रकार आंदोलन करतील असा इशारा देताच प्रशासन सजग झाले.

दुसऱ्याच दिवशी एमआयडीसीकडून पाईपलाईंनचे काम करुन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला, परंतु पाण्याचा दबाव वाढत असताना तासाभरात जलशुध्दीकरण केंद्राजवळ पाईपलाइन फुटली. या वेळी



रसायनी व आसपासच्या परिसरातील पाणीपुरवठा पुन्हा बंद झाला. रसायनीकरांचा तब्बल पन्नास तास पाणीपुरवठा बंद होता.

यावेळी पाण्यासाठी रसायनीकरांची धावपळ सुरु असल्याचे चित्र पहावयास मिळत होते. गुरुवार दि.९ रोजी सकाळी आंघोळीस व पिण्याच्या पाण्यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते.

याबाबत खराडे यांना दूरध्वनीवरून विनंती केली की पाण्यासाठी प्रयत्न करा. ग्रामस्थांच्या समस्येचे निराकरण करत स्वःखर्चाने ग्रामस्थांसाठी मोहोपाडा मुख्य बाजारपेठ गावाला पिण्याच्या पाण्याचे टॅंकर ग्रामस्थांसाठी उपलब्ध करून देवून सामाजिक बांधिलकी जोपासली. त्याबद्दल ग्रामस्थांनी आभार मानले.

# रसायनीत असंसर्गजन्य रोगांवर जनजागृती व तपासणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

हुमाना पीपल टू पीपल इंडिया मर्क स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड प्रोजेक्ट लिमिटेड द्वारे प्रोजेक्ट निरामया रिस पाताळगंगा या संस्थेच्यावतीने पाताळगंगा परिसरात असंसर्गजन्य रोगांवर जनजागृतीचे काम चालू आहे. त्याचबरोबर यांच्या तपासण्या करणे याचे सुद्धा कार्य चालू आहे.

या कार्या व्यतिरिक्त इतर ऍक्टिव्हिटी म्हणून रसायनीतील चांभार्ली ग्रामपंचायत हद्दीतील पराडा या गावामध्ये ग्राम स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेमध्ये चांभार्ली ग्रामपंचायत मधील सरपंच, उपसरपंच ,पंचायत सदस्य, ग्रामसेवक व इतर सर्व कर्मचारी तसेच प्रोजेट निरामया पाताळगंगाचे प्रोजेक्ट लीडर पिंटू कुमार शर्मा तसेच प्रोजेक्ट निरामया येथील प्रोजेक्ट लीडर विठ्ठल ठाकरे सर उपस्थित होते. यांनी योग्य ते सहकार्य केले. या कार्यक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.



# ग्रीन राईसची गुळसुंदेत लागवड

**रसायनी : प्रतिनिधी**

कृषीभुषण पुरस्कार प्राप्त शेतकरी मीनेश गाडगीळ हे नेहमी नाविन्यपूर्ण असे प्रयोग आपल्या शेतात करत असतात, त्यानी आत्तापर्यंत ब्लॅक बर्मा, लाल,नीळा,जांभळा अशा प्रकारच्या पिग्मेंटेड राईसची आपल्या शेतात लागवड केलेली आहे .यावर्षी त्यानी व्हिएतनाम व्हरायटीचा ग्रीन राईस आपल्या गुळसुंदे येथील शेतात लागवड केला आहे.



या तांदुळात क्लोरोफील कंटेंट जास्त असल्याने या तांदुळाला हिरवा रंग प्राप्त होतो.या तांदुळास एक वेगळाच सुवास असुन, या तांदुळाची ग्लॅयसेमिक इन्डेक्स कमी आहे,त्यामुळेच डायबेटीक पेशंट हा तांदुळ आपल्या आहारात घेउ शकतात. न्टी ऑक्सीडन्ट इफेक्ट या तांदुळात अढळुन येतो.क्लोरोफील कंटेट मुळे शरीरातील टॉक्सीन न्युट्रल करण्याचा गुणधर्म या तांदुळातआहे.साधारण १४० दिवसात तयार होणारे हे वाण असुन, एकरी १५०० कीलो पर्यंत याचे उत्पादन मिळते.या प्रमाणेच त्यानी थायलंड वरुन जस्मीन राईस बीयाणे आणले असुन , प्रयोगीक तत्वावर त्यांनी त्याची लागवड केलेली आहे व त्याचे पुढील वर्षासाठी बीयाणे तयारकरण्याचे काम त्यांचे चालु आहे. जस्मीन राईस हा सर्वात सुगंधी तांदुळ म्हणुन गणला जातो.

बथजीना कोलम नावाचे तांदुळाचे पारंपारिक वाण होते ,जे सद्ध्या नामशेष झाले आहे, त्याचीही लागवड मीनेश गाडगीळ यानी केलेली आहे. पुढील हंगामात त्याचे बीयाणे इतर शेतकऱ्यांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न ते करणार आहेत.

# फुंडे येथे विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा उत्साहात

**उरण : बातमीदार**

तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे इयत्ता १२ वी कला शाखेचा विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात झाला.



विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू यांनी विद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या उज्वल परंपरेचा आढावा घेत विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेत यश मिळावे, अशा शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांनी वाढत्या शहरीकरण आणि स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे मार्गदर्शन केले. त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला तसेच बोर्ड परीक्षेसाठी अभ्यासाचे नियोजन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमास वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोद ठक्कर विशेष उपस्थित होती. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात स्कूल कनेक्ट या संकल्पनेच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालय यांचा सहसंबंध स्पष्ट केला. तसेच महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्याच्या संधी उपलब्ध करून देण्याचे व त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

दि. रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि. सातारा चे संचालक प्रा. किशोर पाटील व प्रा. हरिश्चंद्र हरड यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.सदर सभेस विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका संगीता थोरात प्रमुख उपस्थित होत्या. प्रा. परशराम कदम, सविता म्हात्रे व प्रा. प्रमोद म्हात्रे यांनी सभेचे यशस्वी नियोजन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रा. कचरू सरोदे यांनी मानले. संपूर्ण मेळावा प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

# विश्रांतीनंतर मच्छीमार बोटी निघाल्या समुद्रात

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील एकदरा, राजपुरी, आगरदांडा, बोर्ली, कोर्लेई या परिसरातील मासेमारी बोटी समुद्रात मासेमारीकरिता जाण्यास सुरुवात केली आहे. त्याआधी सकाळी बोटीत महिन्यांभरचे कडधान्य, बर्फ, पुरेशी औषध, पिण्याचे पाणी आदींसह सामान भरण्यासाठी मासेमारी कोळी बांधवांची लगबग सुरू झाली आहे.



शासनाने १ ऑगस्ट पासून समुद्रात जाण्यास व मासेमारी करण्यात मान्यता दिल्यापासून समुद्रात तीनदा वादळ आल्याने मासेमारी कोळी बांधवांचं खुप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे .आता वादळ शांत झाल्याने मच्छीमार बांधव नव्या उत्साहात दर्यावर स्वार होण्यासाठी सज्ज झाला असून बोटी समुद्रात जाऊ लागल्या आहेत.

अवकाळी पाऊस व जोरदार वारे यामुळे मासेमारी करणे खूप अवघड बनले होते. नुकतीच मासेमारी सुरु झाली असताना वातावरणात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने अवकाळी पाऊस लांबला त्यामुळे मासेमारी थांबवणे क्रमप्राप्त बनले होते.

सध्या वातावरण निरभ्र व पावसाचे काळे ढग निघून गेल्याने मासेमारी करण्याचे चांगले वातावरण तयार झाल्याने हळूहळू बोटी खोल समुद्रात जाऊ लागल्या आहेत. प्रखर सूर्यप्रकाश समुद्राचे पाणी शांत झाल्याने पुन्हा एकदा जोमाने मासेमारीस सुरुवात झाली आहे.

मुरुड तालुक्यात सुमारे ६५० लहान व छोट्या बोटी असून आता सर्वच भागातून मासेमारीस सुरुवात झाली आहे. तालुक्यासह शहरातील हजारो कुटुंब मासेमारी व्यवसायावर अवलंबून असतात.

पावासाळ्यात संपुर्ण मासेमारी बंद होती. बंदी उठल्यानंतर मासेमारी करणारे कोळी बांधव समुद्रात मासेमारी करिता सज्ज होत्या, मात्र दोन दिवसांतच दोनदा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत असल्याने पुन्हा बोटी किनाऱ्यावर लावल्या गेल्या. एका बोटीत साधारण १० खलाशी व एक नाखवा असतो. त्यांचा पगार अंगावर पडल्याने नाखवांना म्हणजे बोट मालकांना आर्थिक नुकसानला सामोरे जावे लागले.

आता हवामान चांगले आहे. आकाश निरभ्र दिसत आहे. त्यामुळे मासेमारी बोटी समुद्रात जाण्यास तयार झाले आहे. अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा मच्छीमार सहकारी सोसायटीचे उपाध्यक्ष मुरूड सागर कन्या मच्छीमार सहकारी सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले यांनी दिली.

# पाली येथे कचरा व्यवस्थापनासाठी उपाययोजना करण्याची मागणी

**पाली : प्रतिनिधी**



पाली नगरपंचायतीच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी मंजूर करण्यात आलेली इन्सिनेटर मशीन ही अंदाजे गेल्या दीड वर्षापासून निष्क्रिय अवस्थेत पडून आहे. शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर झालेल्या या यंत्रणेचा पुन्हा वापर व्हावा, अशी मागणी होत आहे.

नगरपंचायतीच्या डम्पिंग ग्राउंडवर संरक्षण भिंत नसल्याने कचरा रस्त्यावर पसरतो, दुर्गंधी निर्माण होते. या ठिकाणी वसाहती, आयटीआय आणि विद्युत महावितरण केंद्र आहे.

महाराष्ट्र नगरपंचायत अधिनियम १९६५ व घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६नुसार प्रत्येक नगरपंचायतीने ओला व सुका कचऱ्याचे स्वतंत्र संकलन, प्रक्रिया व विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे.

स्थानिक नागरिकांनी इन्सिनेटर मशीन कार्यान्वित करणे, डम्पिंग ग्राउंडला संरक्षक भिंत बांधणे आणि कचरा वर्गीकरणाची प्रक्रिया सुरू करणे यासाठी नगरपंचायतीकडे लेखी मागणी केली आहे.

लोकहितासाठी आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने नगरपंचायतीने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिक करत आहेत. या संदर्भात कार्यवाही अपेक्षित आहे.

# पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेमुळे आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या निर्णयानुसार २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षांसाठी पुनर्निर्दिष्ट हवामानावर आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या उत्पादनातील नुकसानीपासून संरक्षण मिळणार आहे.

या योजनेसाठी एम. अफ्रीड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून शेतकऱ्यांनी आपल्या फळपीकासाठी नोंदणी करून निश्चित मुदतीत विमा हप्ता भरावा. या योजनेत नैसर्गिक घटकांमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी संरक्षण मिळणार आहे.

काजू फळपीकासाठी १ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत अवकाळी पाऊस, कमी तापमान आणि गारपीट यांसाठी विमा लागू राहील. या विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टर ६,००० निश्चित करण्यात आला असून विमा संरक्षण रक्कम १,२०,००० आहे.

आंबा फळपीकासाठी १ डिसेंबर ते ३१ मार्च तसेच १५ मेपर्यंत अवकाळी पाऊस, तापमानातील बदल, वाऱ्याचा वेग आणि गारपीट या नैसर्गिक संकटांपासून विमा संरक्षण मिळणार आहे. या विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टर १४,४५० असून विमा संरक्षण रक्कम १,७०,००० आहे.

शेतकऱ्यांनी आपला ७/१२ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक तसेच Geo Tagging केलेला फळपिकाचा फोटो सादर करून अर्ज सादर करावा. नोंदणी आणि हप्ता भरण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर आहे.

नोंदणीसाठी शेतकरी जवळच्या बँक, सीएससी केंद्र किंवा कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://pmfby.gov.in या ठिकाणी अर्ज करू शकतात. पात्र शेतकऱ्यांनी यासंबंधी कार्यवाही करावी.

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानीपासून संरक्षण मिळवण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत फळपीक विमा हप्ता भरून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

# काँग्रेस युवा अध्यक्षासह इतरांचा राष्ट्रवादीत प्रदेश; मोहोपाड्यात कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

वासांबे (मोहोपाडा) परिसरातील वेगवेगळ्या पक्षातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला आहे.



सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची ही राज्य निवडणूक आयोगाकडून तयारी सुरू झाली आहे. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रभागांचे आरक्षण जाहीर होणार आहे. तर ३ नोहेंबरपर्यंत मतदार यादी अंतिम जाहीर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर मोहोपाडा, रसायनी परिसरातील विविध पक्षांतील आणि काही समाजातील लोकांनी वासांबे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदीप मुंढे यांच्या कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

काँग्रेस पक्षाचे रायगड युवा अध्यक्ष सुरज पाटील, उद्योजक नितीन पाटील, मातंग समाजाचे नेते व कार्यकर्ते यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत त्यांच्या पक्षात प्रवेश केला.

या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, महिला अध्यक्ष उमा मुंढे, माजी सरपंच संदीप मुंढे, खालापूर तालुकाध्यक्ष संतोष बैलमारे, नेते संतोष पाटील, कैलास म्हात्रे यांच्यासह अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात ज्यांनी आज प्रवेश केला त्यांना योग्य न्याय व सन्मान देण्यात येईल, असे आश्वासन प्रदेशाध्यक्ष खासदार तटकरे यांनी या वेळी दिले.

# तळा येथील जि.प. मराठी शाळेस प्रिंटर भेट

**तळा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा तळा या मराठी शाळेस नुकतेच कन्या शाळेच्या माजी विद्यार्थिनी उज्वला वामन शिर्के यांच्याकडून अंदाजे ११००० रुपये किमतीचा एक कलर प्रिंटर भेट देण्यात आला आहे.

या वेळी शाळेचया मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, शिक्षक सुनील बयकर, मित्तल वावेकर, राजू थिटेकर, श्री. निकम, श्रीमती माडी व शिर्के कुटुंबीय उपस्थित होते. या वेळी शिर्के कुटुंबीयांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले.

भेट स्वरूपात प्रिंटर दिल्याने शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी व शाळेत माहितीसाठी तो उपयोगी ठरणार आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे.



# मुरूडच्या खोरा बंदरातील नूतन जेटीचा स्लॅब उद्घाटनाधीच फुटला; रस्ताही निकृष्ट दर्जाचा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील खोरा बंदर अंतर्गत प्रवासी जेट्टीचे काम पूर्ण झाले. किल्ल्यात जाणाऱ्या पर्यटकांसाठी ही जी नवीन जेट्टी बांधली आहे, तिचे अद्याप उद्घाटन झाले नाही, मात्र जेट्टीच्या प्रवासी उतरण्याच्या पायरीचा स्लॅब फुटला असून कधीही पडून अपघात होईल अशी स्थिती आहे.





याचबरोबर मुरूड खोरा बंदर येथील मुख्य रस्त्यापासून ते बंदर कार्यालय इथपर्यंत अंतर्गत रस्त्याचे काम तसेच जेट्टी परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या कामांकरिता शासनाने निधी देत ठेकेदाराकडून करुन घेतले, पण हे काम सहा महिनेही टिकू शकले नाही. रस्त्यामधून सिमेंटचा भुसा, दगडे बाहेर येऊन रस्ता पूर्णतः धुपून गेला आहे. या कामाची वस्तुस्थिती पाहता संबंधित ठेकेदाराने हे काम निकृष्ट दर्जाचे केले असून रस्त्यावरून चालत असताना बाजूने एखादी बाईक जरी गेली तरी रस्त्यावरचा सिमेंटचा भुसा हा उडून नाका, तोंडात जात आहे.

शिवाय, या रस्त्यावर टाकण्यात आलेले स्पीडब्रेकर छोटे आणि उंच असल्याने वाहने जोरात आपटतात. अनेकांचे अपघातही झाले आहेत. त्यामुळे ठेकेदार व त्यांना सहकार्य करणारे अधिकारी यांची चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

> खोरा बंदर जेट्टीत त्रुटी असल्याचे अनेकवेळा दाखूनदेखील ठेकेदार काम पूर्ण करत नसल्याने त्याला नोटीस देण्यात आली आहे, तर रस्त्याचे काम पुन्हा नवीन टेंडर काढून लवकरच सुरू होणार आहे. परीक्षण झाल्याशिवाय पर्यटकांना जाण्यासाठी जेट्टी खुली केली जाणार नाही. **–प्रमोद राऊळ, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड**

# शिहू, बेणसे विभागातील भातपिके कुजली, शेतकऱ्यांचे नुकसान

## शासनाकडे मदतीची मागणी; वेळीच दिलासा देण्याची अपेक्षा

**पाली : प्रतिनिधी**


शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो, मात्र सद्यस्थितीत नैसर्गिक आपत्ती, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, अतिवृष्टीने शेतकरी अक्षरशः उद्ध्वस्त झालाय. अतिवृष्टीत शेतकऱ्यांचे सोन्यासारखे पीक मातीमोल झाले. शिहू, बेणसे विभागात हातातोंडाशी आलेला घास गळून पडला. कापणीला आलेली भातपिक चिखलात रुतून त्याला कोंब आल्याची परिस्थिती पहावयास मिळते आहे.

या परिस्थितीने येथील शेतकरी हवालदिल झाला असून अतिवृष्टीने इथल्या शेतकऱ्यांना रडवले आहे. मायबाप शासनाने सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

सतत पडलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी शेतात पाणी झाले आणि भाताचे रोप त्यात बुडाले. खाडीलगत असलेली शेती तर अक्षरशः पाण्याखाली आली. गुडघाभर चिखलात जाऊन शेतकरी पीक सावरण्यासाठी धडपडताना दिसला, मात्र त्याची अवस्था केविलवाणी होताना दिसतेय. काही भागात पीक कुजण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. एकीकडे उत्पादन घटल्याने कुटुंबाला वर्षभर लागणारा भात उपलब्ध होणार नाही, तर दुसरीकडे बाजारातून महागडे भात हे धान्य विकत घ्यावे लागेल. हा खर्च शेतकऱ्यांच्या परवडण्याच्या पलीकडे जाणारा आहे. त्यामुळे आता कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा? जगावे की मरावे असा प्रश्न प्रत्येक शेतकऱ्याला भेडसावत आहे, असे शेतकरी के.के. कुथे (आप्पा) यांनी सांगितले.

> **अतिवृष्टीत झालेल्या पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे करून भरपाई देणे हीच सध्या शेतकऱ्यांची एकमेव अपेक्षा आहे. शासनाने शेतकऱ्यांना या कठीण प्रसंगी सावरणे गरजेचे आहे, कारण अनेक शेतकरी भात पिकावरच कुटुंबाचा आधार ठेवतात. काही वेळा पंचनामे होतात, पण भरपाई मिळत नाही. या नुकसानीचा दैनंदिन जीवनमानावर याचा थेट परिणाम होत असून काही ठिकाणी शेतकरी कर्जबाजारी होण्याची शक्यता वाढत आहे. शेतकरी दिवसरात्र काबाडकष्ट करून मेहनतीने पीक उभे करतो, पण अतिवृष्टीत निसर्गानेच ते हिरावून घेतले जाते. आता शासनाने मदत केली नाही तर वर्षभर शेतकऱ्याला संघर्षमय जीवन जगावे लागेल. ते पाहता शेतकऱ्याला मदतीचा हात देणे गरजेचे आहे.**
>
> **–अनंत भुरे, अध्यक्ष, शेतकरी संघर्ष समिती रायगड**





# आकाशकंदील उडविण्यावर बंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आकाशकंदील हवेत सोडणे, विक्री करणे आणि साठा ठेवणे यावर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. हा आदेश १७ ते २४ ऑक्टोबर या कालावधीत प्रभावी राहील.

पोलीस उपायुक्त (विशेष शाखा) रश्मी नांदेडकर यांनी जारी केलेल्या आदेशानुसार दिवाळीच्या काळात नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रज्वलित आकाशकंदील हवेत सोडले जातात. हे कंदील जमिनीवर येताना आग लागणे, मालमत्तेचे नुकसान किंवा इतर गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने ही बंदी आवश्यक आहे. या आदेशानुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत प्रज्वलित आकाशकंदील उडविणे, विक्री व साठा करणे पूर्णपणे प्रतिबंधित असेल. या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३चे कलम २२३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.नागरिकांनी सण साजरा करताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि कायद्याचे पालन करून इतरांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

# निळज आदिवासीवाडी रस्त्याचे खासदार तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

निळज गावातील व परिसरातील विकासकामे १०० टक्के पूर्ण करू, असे खासदार सुनील तटकरे यांनी या भागातील ग्रामस्थांना आश्वासित करताना सांगितले.

माणगाव तालुक्यातील इंदापूर विभागातील निळज आदिवासीवाडीकडे जाणाऱ्या रस्त्याचे भूमिपूजन शनिवारी (दि. ११) खासदार तटकरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शेखर देशमुख, गजानन अधिकारी, प्रवक्ता ॲड.सायली दळवी, तालुकाध्यक्ष काका नवगणे, प्रदेश युवक सचिव दीपक जाधव, जिल्हा युवक राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष उदय अधिकारी, रातवड सरपंच सतीश पवार, बाळा खातू, महेश महाजन, राष्ट्रवादी महिला आघाडी तालुका उपाध्यक्ष श्रद्धा यादव, इंदापूर-कशेणे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष मनोज जैन, सचिव समीर मेहता, नितीन घोणे, शुक्रादास मोरे, नंदू उभारे, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आदींसह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते,ग्रामस्थ व महिला मंडळ उपस्थित होते.

या वेळी बोलताना खासदार तटकरे यांनी, वर्षानुवर्षे जो वर्ग काबाडकष्ट करून आपले जीवन जंगल भागात व्यतीत करतो त्या आदिवासी बांधवांच्या वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाचा आज आपण शुभारंभ केला. या रस्त्याच्या कामाला वन विभाग काही अडथळे निर्माण करीत असेल तर ते अडथळे आपण दूर करू. निळज गावाच्या व परिसराच्या विकासासाठी आम्ही सारी मंडळी कटीबद्ध असल्याचेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश युवक सचिव दीपक जाधव यांनी सांगितले की, या गावात विरोधकांचे कोणतेही विकासकाम नाही. जी विकासकामे झालीत ती तटकरे कुटुंबियांच्या माध्यमातून झाली आहेत. विरोधक केवळ निवडणुका आल्यावर गावात येतात व ग्रामस्थांना विकासकामांच्या भूलथापा देत असतात. या भागात तटकरेसाहेब, आदितीताई यांच्या माध्यमातून विकासकामे झाली असून सर्वजण एकमुखी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोबत आहेत.



# भारताचा वेस्ट इंडिजला फॉलोऑन

## दुसऱ्या डावात कॅम्पबेल-होपची चिवट खेळी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाविरुद्ध दुसऱ्या कसोटी सामन्यात फॉलोऑनची नामुष्की ओढावल्यावर वेस्ट इंडिज संघाने अखेर दुसऱ्या डावात फलंदाजीतील धमक दाखवून दिली. पहिल्या कसोटी सामन्यापासून ते अगदी दिल्लीच्या मैदानात रंगलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावापर्यंत एकाही बॅटरला अर्धशतक झळकावता आले नव्हते, पण शई होप आणि कॅम्पबेलच्या फलंदाजीच्या जोरावर अखेर तिसऱ्या दिवसातील अखेरचे सत्र वेस्ट इंडिजच्या संघाने आपल्या नावे केले. तिसऱ्या दिवसाच्या समाप्तीपर्यंत पाहुण्यांनी दोन गडी बाद



१७३ धावा केल्या आहेत.

भारतीय संघाने फॉलोऑन दिल्यावर दुसऱ्या डावातही संघाची सुरुवात खराब झाली. मोहम्मद सिराजने टॅगेनरीन चंद्रपॉल याला अवघ्या १० धावांवर तंबूचा रस्ता दाखवला. कर्णधार शुबमन गिलने सर्वोत्तम झेल टिपत त्याच्या खेळीला ब्रेक लावण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पहिल्या डावात सर्वोच्च धावसंख्या करणारा अलिक अथनाझे याला वॉशिंग्टन सुंदरने सात धावांवर माघारी धाडले. ३५ धावांवर वेस्ट इंडिज संघाने पहिल्या दोन विकेट गमावल्या होत्या, पण त्यानंतर पहिल्यांदाच टीम इंडियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत दोघांच्या भात्यातून अर्धशतक पहायला मिळाले.

भारतीय संघ पुन्हा कॅरेबियन फलंदाजांना अडचणीत आणेल असे चित्र निर्माण झाले असताना शई होप आणि सलामीवीर जॉन कॅम्पबेल ही जोडी जमली. हा संघ अजूनही ९७ धावांनी पिछाडीवर आहे.

# डॉजबॉल स्पर्धेत 'सीकेटी'चा संघ उपविजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुका क्रीडा संकुल येथे झालेल्या १९ वर्षांखालील मुलींच्या जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील मुलींच्या डॉजबॉल संघाने उपविजेतेपद पटकाविले.



याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी उपविजेत्या मुलींच्या डॉजबॉल संघाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पनवेल येथे खो-खो स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून खेळाडूंना शुभेच्छा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने खो-खो स्पर्धा १४, १७, १९ वर्षे मुला-मुलींच्या गटासाठी पनवेल तालुका क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आली होती. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलेले आमदार प्रशांत ठाकूर यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

आपल्या भाषणात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नव्या शैक्षणिक धोरणात खेळाडूंना उदरनिर्वाहासाठी आवश्यक असलेली डिग्री मिळवता मिळवता आवडीचे शिक्षण घेण्याची मुभा देण्यात आली आहे. पुढील काळात स्पोर्ट्स हे एक यशस्वी करिअर म्हणून घडू शकते याची मला खात्री आहे. शासनाच्या माध्यमातून जे काही करणे आवश्यक आहे ते अधिकारी मंडळींच्या सहकार्याने करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

या स्पर्धेत विविध वयोगटातील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेच्या माध्यमातून तरुणाईत क्रीडास्पृहा वाढवण्याचा उद्देश साधला गेला. कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडले.

# कर्जत तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धेचा समारोप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पंचायत समिती शिक्षण विभाग आणि शासनाचे क्रीडा व युवक संचालनालय यांच्या माध्यमातून पावसाळी क्रीडा स्पर्धा तालुक्यातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा समारोप मैदानी खेळाच्या आयोजनानंतर झाला. तालुक्यातील ६९७८ विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.



कर्जत तालुका पंचायत समिती गटविकास अधिकारी सुशांत पाटील आणि गटशिक्षणाधिकारी अनंत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा महोत्सवचे आयोजन तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील आणि समीर येरूणकर यांनी केले होते. यात कबड्डी, खो-खो, मैदानी, हॉलीबॉल, कॅरम, कुस्ती, कराटे, योगासने, बुद्धिबळ आणि बॅडमिंटन अशा एकूण १० खेळांचे सामने झाले.

सर्व क्रीडा स्पर्धा १४, १७ आणि १९ वर्ष अशा तीन वयोगटांमध्ये मुले आणि मुलींसाठी घेण्यात आल्या. यामध्ये कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद, सर्व माध्यमांच्या अनुदानित तसेच विनाअनुदानित आणि आश्रमशाळांमध्ये इयत्ता सहावी ते बारावीमध्ये शिकणाऱ्या मुले आणि मुली अशा ६७९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धा अभिनव प्रशाला कर्जत, गुड शेफर्ड इंग्लिश मीडियम स्कूल गुंडगे, बाबा इंटरनॅशनल स्कूल बामणोली, दिलक्याप इंजिनिअरिंग कॉलेज ममदापूर आणि माथेरान व्हॅली इंग्लिश स्कूल वंजारपाडा येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.

पावसाळी क्रीडा स्पर्धेचा समारोप कबड्डी, खो खो तसेच मैदानी खेळांनी झाला. हे सामने नेरळजवळील वंजारपाडा येथील माथेरान व्हॅली स्कूल आवारात झाले. या वेळी प्रमुख पाहिऊने म्हणून गटविकास अधिकारी सुशांत पाटील, गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे उपस्थित होते तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे उपस्थित होते. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची जिल्हा क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

## पाच विकेट्ससह कुलदीप यादवची

# विश्वविक्रमाला गवसणी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघातील डावखुरा फिरकीपटू कुलदीप यादव संधी मिळाली की सोने करतोच. इंग्लंड दौरा बाकावर बसून काढल्यावर वेस्ट इंडिजविरुद्धच्या घरच्या मैदानातील कसोटी मालिकेत त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळाली. दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात त्याने आपल्या फिरकीची जादू दाखवून दिली. पहिल्या डावात वेस्ट इंडिजचा अर्धा संघ तंबूत धाडत त्याने विश्वविक्रमाला गवसणी घातली.

कुलदीप यादवने वेस्ट इंडिजविरुद्ध पाच विकेट्सचा डाव साधला. कसोटी कारकिर्दीत पाचव्यांदा त्याने हा पराक्रम करून दाखवलाय. एवढेच नाही तर सर्वात कमी डावात पाच किंवा त्यापेक्षा अधिक विकेट्स घेण्याचा मोठा पराक्रम त्याने करून दाखवला आहे. क्रिकेट जगतात कोणत्याही डावखुऱ्या फिरकीपटूने केलेली ही सर्वात जलद कामगिरी ठरली.

कुलदीप यादवने इंग्लंडचा दिग्गज जॉनी वॉर्डल यांना मागे टाकले आहेत. या दिग्गजाने पाच वेळा 'पंजा' मारण्यासाठी २८ सामने खेळले होते. कुलदीप यादवने फक्त १५ व्या सामन्यात पाचव्यांदा 'पंजा' मारत नवा वर्ल्ड रेकॉर्ड सेट केला आहे.

# नामिबियाकडून द. आफ्रिकेचा टी-२०मध्ये धक्कादायक पराभव

**विंडहोक : वृत्तसंस्था**

टी-२० क्रिकेट इतिहासात मोठा अपसेट पहायला मिळाला आहे. नामिबिया आणि दक्षिण आफ्रिका या संघांमध्ये पहिलाच टी-२० सामना खेळवला गेला आणि या सामन्यात नामिबियाने बलाढ्य आफ्रिकेच्या संघाचा दारुण पराभव केला आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ पहिल्यांदाच कोणत्याही असोसिएट संघाविरूद्ध पराभूत झाला आहे.

दक्षिण आफ्रिकेने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत आठ गडी गमावून १३४ धावा केल्या. त्यानंतर नामिबिया संघाने २० षटकांत सहा गडी गमावून अखेरच्या चेंडूवर विजय मिळवला. नामिबियासाठी हा ऐतिहासिक विजय आहे, कारण संघ घरच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय सामना खेळण्यासाठी पहिल्यांदाच मैदानावर उतरला होता. हा संघ पूर्ण वेळ क्रिकेट



खेळणाऱ्या राष्ट्रांचाही भाग नाही आहे.

द. आफ्रिकेच्या जे स्मिथने सर्वाधिक ३१ धावांची खेळी केली. याशिवाय लहान डे प्रिटोरियसने २२ आणि रुबिन हेरमान याने २३ धावा केल्या आफ्रिकेचे इतर सर्व फलंदाज नामिबियाच्या गोलंदाजीसमोर फेल ठरले. नामिबियाच्या गोलंदाजांची कामगिरी सर्वोत्तम होती, ज्यामध्ये त्यांनी दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना फार वेळ मैदानावर टिकण्याची कोणतीही संधी दिली नाही. ट्रम्पेलमनने तीन, मॅक्स हींगोने दोन आणि कर्णधार जेरार्ड, स्मिथ आणि बेन शिकोंगोने प्रत्येकी एक विकेट घेतली.

विजयासह आयसीसी टी-२० क्रमवारीत १६व्या क्रमांकावर असलेला नामिबिया संघ आगामी टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

## दिल्ली कसोटीत बुमराहचे विशेष अर्धशतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामना यांच्यातील दुसरा कसोटी सामना जसप्रीत बुमराहसाठी खास ठरला. तो ५०वा कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरल्याचे पहायला मिळाले. क्रिकेटच्या तिन्ही प्रकारात ५० सामने खेळणारा तो एकमेव भारतीय जलदगती गोलंदाज ठरला आहे.

तिसऱ्या दिवसाच्या खेळात कुलदीप यादवने आपल्या फिरकीची जादू दाखवल्यावर जसप्रीत जसप्रीत बुमराह पिक्चरमध्ये आला. या सामन्यातील ११व्या षटकात बुमराहने पहिली विकेट आपल्या खात्यात जमा केली. खारी पिएरला त्याने एका अप्रतिम यॉर्करवर तंबूचा रस्ता दाखवला.

बुमहारशिवाय क्रिकेटच्या तिन्ही प्रकारात ५०पेक्षा अधिक सामने खेळणारे भारतीय खेळाडू महेंद्रसिंह धोनी, विराट कोहली, रवींद्र जडेजा, रविचंद्रन अश्विन, रोहित शर्मा, के.एल. राहुल हे आहेत, पण जलदगती गोलंदाज बुमराह एकमेव आहे. या गोलंदाजाने भारतीय वेगवान माऱ्याची धुरा समर्थपणे सांभाळलेली आहे.

# वनडे संघातून वगळल्याबद्दल अखेर जडेजा झाला व्यक्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा सध्या उत्कृष्ट फॉर्मात आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी मालिकेत तो चेंडू आणि बॅटने कमालीची कामगिरी केली आहे. याशिवाय चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या विजयातही जडेजाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. यानंतरही जडेजाला ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेतून वगळण्यात आले आहे. याबाबत आता पहिल्यांदाच त्याने वक्तव्य केले आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी स्टार अष्टपैलू रवींद्रची निवड करण्यात आली नाही. निवडकर्त्यांच्या या निर्णयामुळे चाहते आणि क्रिकेटतज्ज्ञ सर्वच गोंधळात पडले आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजी आणि चेंडू दोन्हीकडून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या रवींद्र जडेजाने दिल्ली कसोटीदरम्यान पहिल्यांदाच या निर्णयावर प्रतिक्रिया



दिली. त्याने मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनाही प्रश्न विचारला.

दिल्ली कसोटीच्या दुसऱ्या दिवसानंतर पत्रकार परिषदेत भारताचा स्टार अष्टपैलू रवींद्र जडेजाने २०२७च्या विश्वचषकाबाबत एक महत्त्वपूर्ण वक्तव्य केले. एकदिवसीय संघातून वगळल्याबद्दल विचारले असता जडेजा म्हणाला, हे माझ्या हातात नाही. नक्कीच, मला २०२७चा विश्वचषक खेळायचा आहे, पण शेवटी संघ व्यवस्थापन, निवड समिती, प्रशिक्षक आणि कर्णधार यांनी काहीतरी विचार केला असेल, ज्यामुळे त्यांनी मला या मालिकेसाठी संघात निवडले नाही. त्यामागे नक्कीच काहीतरी कारण असेल.

जडेजा म्हणाला, त्यांनी माझ्याशी या निर्णयाबद्दल चर्चा केली होती. म्हणजेच संघ जाहीर झाला तेव्हा माझी निवड केली नव्हती हा माझ्यासाठी धक्का नव्हता. ही चांगली गोष्ट आहे की कर्णधार, निवड समिती आणि प्रशिक्षकांनी मला त्यांच्या विचारांबद्दल आणि निर्णयामागील कारणांबद्दल सांगितले. मी त्याबद्दल समाधानी आहे.

पुढे बोलताना जडेजा म्हणाला, पण पुढे जेव्हा संधी मिळेल, तेव्हा मी गेल्या अनेक वर्षांपासून जसे खेळत आलो आहे तसेच सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करेन. जसे तुम्ही मोठ्या स्पर्धेबद्दल म्हणजेच विश्वचषकाबद्दल बोललात, तर जर मला खेळण्याची संधी मिळाली, त्याआधी काही एकदिवसीय सामने असतील. त्या सामन्यांमध्ये जर मी चांगली कामगिरी केली आणि विश्वचषकात संधी मिळाली, तर ते संघासाठी खूप चांगले ठरेल.



# स्मृती मानधनाने रचला नवा इतिहास

**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

महिला वनडे वर्ल्डकप स्पर्धेतील ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात भारताची सलामीची बॅटर आणि उपकर्णधार स्मृती मानधना हिने नवा इतिहास रचला आहे. महिला वनडेत एका कॅलेंडर ईयरमध्ये एक हजार धावा करणारी ती पहिली बॅटर ठरली आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यातच स्मृतीने बेलिंडा क्लार्क हिचा एका कॅलेंडर ईयरमध्ये सर्वाधिक ९७० धावा करण्याचा विक्रम मोडीत काढला होता. ऑस्ट्रेलियाविरुद्ध १८ धावा करताच स्मृतीनं कॅलेंडर ईयरमध्ये हजार धावांचा पल्ला गाठला. सोफी मोलिन्यूसच्या गोलंदाजीवर षकार खेचत तिने ही विक्रमी कामगिरी नोंदवली.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com